गुरूवार, २० जून २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २८७
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 20 JUNE 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-287 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

# मनोज जरांगे भंपक माणूस

## प्रा. लक्ष्मण हाके : त्यांनी कायद्याने उत्तर द्यावे

आधुनिक केसरी न्यूज

**जालना : मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांनी ओबीसी उपोषणाला सरकार पुरस्कृत म्हणाल्यामुळे ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके आक्रमक झाले. मनोज जरांगे हा भंपक माणूस असून त्यांची माझ्यावर बोलण्याची लायकी नाही. त्यांच्या टीमने माझ्यासमोर चर्चा करायला यावे. मी मीडियासमोर चर्चा करण्यास तयार आहे. त्यांनी कायद्याने उत्तर द्यावे, असे थेट आव्हान प्रा. लक्ष्मण हाके यांनी बुधवारी दिले.**



राज्यामध्ये मराठा आरक्षण व ओबीसी आरक्षणाचा मुद्दा चर्चेत आला आहे. याआधी मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी उपोषण केले. त्यानंतर आता प्रा. लक्ष्मण हाके यांनी ओबीसी आरक्षणासाठी उपोषणाचे हत्यार उगारले आहे. जरांगे पाटील हे मराठा आरक्षण ओबीसीमधूनच पाहिजे असल्याच्या मागणीवर ठाम आहेत. तर प्रा. हाके ओबीसी आरक्षण वाचवण्याच्या मागणीवर ठाम आहेत. या दोन्ही नेत्यांमध्ये बुधवारी जोरदार खडाजंगी झाली. मनोज जरांगे पाटील यांनी प्रा. लक्ष्मण हाके यांच्या उपोषणाला सरकार पुरस्कृत उपोषण असल्याची टीका केली. मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी प्रा. लक्ष्मण हाके यांच्या उपोषणावर टीका केली. जरांगे पाटील म्हणाले, मराठा आणि ओबीसी समाजाच्या आंदोलनामुळे राज्य सरकार कोंडीत सापडले नाही. तर ओबीसी समाजाचे आंदोलन हे सरकार पुरस्कृत आहे. काही गोष्टी घडू लागल्या की लक्षात येते. अगोदरच्या आणि आताच्या आंदोलनात मोठा फरक आहे. टप्प्याटप्प्याने आंदोलकांना भेटायला येणे हे सर्व नियोजित आहे. हे ठरवून सुरू आहे. ही राजकीय नेत्यांची चळवळ आहे हे लक्षात येते. सरकार ठरवून डाव टाकत आहे. पण त्यांनी कितीही डाव टाकले तरी एक दिवस हे त्यांच्याच अंगलट येणार आहे. काहीही घडले तरी मराठा समाज मागे हटणार नाही. आम्ही ओबीसीतूनच आरक्षण घेणार, असा निर्धार मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केला.



**राज्यात पेटला ओबीसी आरक्षणाचा भडका :** ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांचे उपोषण सुरू असून त्यांच्या उपोषणाला राज्यभरातून ओबीसी बांधवांचा पाठिंबा मिळत आहे. बुधवारी शेकडो ओबीसी कार्यकर्ते एकत्र येऊन जालना, अंबड, घनसावंगी परिसरातील रस्त्यांवर उतरत आंदोलन केले. अनेक ठिकाणी रस्त्यावर टायर जाळून निषेध करण्यात आला.

**मनोज जरांगे विधानसभा निवडणूक लढवण्याच्या तयारीत :** लोकसभा निवडणुकांमध्ये मराठा आरक्षण आंदोलनाचा फटका महायुतीच्या उमेदवारांना बसला. त्यातच, मनोज जरांगेंचा इम्पॅक्ट प्रामुख्याने मराठवाड्यात जाणवला असून महायुतीच्या उमेदवारांना मोठा फटका बसला आहे. त्यामुळे, आता विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगानेही मनोज जरांगे यांनी तयारी दर्शवली आहे. सरकारने आरक्षण दिले नाही तर मराठा आंदोलक मनोज जरांगे विधानसभा निवडणूक लढवण्याच्या तयारीत आहेत. त्यासाठी त्यांनी 127 जागांवर पहिला सर्व्हेदेखील केला आहे. खुद्द जरांगे यांनी माध्यमांशी बोलताना ही घोषणा केली.

**हजारो समर्थक हाकेंच्या भेटीला :** ओबीसी आरक्षण बचाव उद्देशान्वये जालन्यातील लक्ष्मण हाके यांचं उपोषण सुरू असून त्यांच्या उपोषणाला ओबीसी बांधवांचा पाठिंबा वाढला आहे. त्याच पार्श्वभूमीवर हिंगोलीहून शेकडो गाड्यांचा ताफा आज ओबीसी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी वडीगोद्री येथे दाखल होत आहेत. हिंगोली आणि वसमतमधील ओबीसी आंदोलन वडीगोद्रीच्या दिशेने आज रवाना होऊ लागलेली आहेत. लक्ष्मण हाके यांच्या उपोषणाचा आजचा सातवा दिवस आहे, बुधवारी बीड, हिंगोली, छत्रपती संभाजीनगर आणि परभणी जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने ओबीसी आंदोलन वडीगोद्रीत पोहचले आहेत.

**जरांगेंच्या निवडणूक निर्णयावर शेंडेगेंची प्रतिक्रिया :** विधानसभा कुणी लढवावी कुणी नाही हा ज्याचा त्याचा अधिकार आहे, संविधानाने दिलेला तो अधिकार आहे. मात्र, मुद्दा हा आहे की मराठा समाजाला सरकारने 10 टक्के आरक्षण दिलं आहे. त्याची अंमलबजावणीही सरकारकडून करण्यात येत आहे. मराठा समाजाने ते 10 टक्के आरक्षण घेण्यास सुरुवातही केली आहे. दुसरं म्हणजे ईडब्लूएसच्या 10 टक्के आरक्षणापैकी 8 .5 टक्के आरक्षणाचा लाभ मराठा समाजाने घेतला आहे. मनोज जरांगे यांनी मागणी ही आहे की, मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण दिलं पाहिजे, आता ओबीसीतून आरक्षण नाही दिलं तर जरांगे म्हणतात आम्ही 288 जागांवर निवडणुका लढवणार, ह्याला पाडणार, त्याला पाडणार. मात्र, आमच्या मुलाबाळांच्या आरक्षणाचं भविष्य उध्वस्त करणारं असेल, तर आमचा समाज गप्प कसा बसेल का, असा सवाल प्रकाश शेंडगे यांनी विचारला. तसेच, जरांगेंविरुद्ध आम्हीही उमेदवार उभे करू, राज्यातील 60 टक्के जाती ओबीसी आहेत, मुस्लीम व दलितांना सोबत घेतले तर आम्ही 80 टक्के होतो, असेही शेंडगे यांनी म्हटले. तसेच, मराठा समाज गरीब झाला तो आमच्यामुळे झाला का, असेही शेंडगे यांनी म्हटले.

# काँग्रेसचे 'चिखल फेको' आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील जनता अनेक समस्यांचा सामना करत असताना महाभ्रष्टयुती सरकार त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. या सरकारने जनतेला वाऱ्यावर सोडून दिले आहे. या महाभ्रष्ट, निष्क्रीय सरकारच्या विरोधात काँग्रेस पक्ष शुक्रवार दिनांक २१ जून रोजी राज्यातील सर्व जिल्हा मुख्यालयी सकाळी ११.०० वाजता सरकारच्या प्रतिमेस चिखल लावून 'चिखल फेको' आंदोलन करून भाजपाप्रणित सरकारचा निषेध करणार आहे.

राज्यातील व केंद्रातील भारतीय जनता पक्षाचे सरकार हे शेतकरी, कष्टकरी, दलित, अल्पसंख्याक, महिला, तरूण, गरिब व सामान्य जनतेच्या विरोधातील आहे. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने चालणाऱ्या महाराष्ट्राच्या प्रतिमेला काळिमा फासण्याचे काम या सरकारने केले आहे. मागील १० वर्षापासून भाजपा सरकारने राज्यातील औद्योगिक विकासाला खिळ घातली आहे. सरकारी नोकर भरती केली जात नाही. स्पर्धा परीक्षा वेळेवर घेतल्या जात नाहीत, ह्या परीक्षा घेतल्या तर पेपरफुटीचे ग्रहण लागते, शेतकरी संकटात आहे पण त्यांना मदत दिली जात नाही. कांदा, कापूस, सोयाबीन यासह कोणत्याही शेतमालाला भाव नाही, सरकार एमएसपी देत नाही. कठिण काळात जनतेला मदत करण्याऐवजी सरकार जनतेचे शोषण आणि आर्थिक पिळवणूक करत आहे. NEET परिक्षेच्या पेपरफुटी व निकालातील गैरव्यवहारामुळे देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य सरकारने धोक्यात आणले आहे.

महागाई, बेरोजगारी, पेपरफुटी, महिला सुरक्षा, खते, बि-बियाणांचा काळाबाजार, कर्जासाठी शेतकऱ्यांची होत असलेली अडवणूक, चिखलात सुरु असलेली पोलीस भरती, राज्यातील सरकारी रिक्त पदे भरण्याबाबत चालवलेली चालढकल, राज्यातील बिघडलेली कायदा व सुव्यवस्था बिघडलेली आहे. श्रीमंतांची पोर गोरगरिबांना गाड्याखाली चिरडून मारत आहेत. मुलींचे दिवसाढवळ्या रस्त्यावर खून पाडले जात आहेत. सत्ताधारी पक्षाकडून जाती धर्माच्या नावाखाली सामाजिक शांतता भंग करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. या सरकारच्या विरोधात जनतेत तीव्र संताप असून सरकारला जाब विचारण्यासाठी आंदोलन केले जाणार आहे. या आंदोलनात जिल्ह्यातील प्रमुख नेते, माजी मंत्री, खासदार, आमदार, माजी खासदार, माजी आमदार, महिला काँग्रेस, युवक काँग्रेस, एनएसयुआय, सेवादल, इंटक, सेल व विभाग यांच्या पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होऊन भाजर सरकारचा निषेध करणार आहेत

# सगळ्यांना चारीमुंड्या चीत करुन राष्ट्रवादी काँग्रेस उभारी घेईल : सुनिल तटकरे

आधुनिक केसरी न्यूज

**अकोले :** अहमदनगर दि. १९ जून - फळे धरलेल्या झाडावरच दगड जास्त मारले जातात. विरोधकांना आज सर्वाधिक भीती अजितदादांच्या राष्ट्रवादीची वाटत असल्याने त्यांच्या बदनामीची मोहीम विरोधकांकडून राबवली जातेय परंतु या सगळ्यांना चारीमुंड्या चीत करुन राष्ट्रवादी काँग्रेस उभारी घेईल असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी अकोले येथे आढावा बैठकीत व्यक्त केला. राज्यात अजितदादांचे हात बळकट करावे यासाठी 'एकच लक्ष्य विधानसभा क्षेत्र' हे ब्रीदवाक्य घेऊन राज्यव्यापी दौऱ्याची सुरुवात केल्याची माहिती सुनिल तटकरे यांनी दिली. राज्याचा सामाजिक रचनेचा पाया शिव - शाहू - फुले - आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांवर टिकलेला आहे. मात्र हा सामाजिक रचनेचा पाया दूषित करण्याचे काम विरोधकांनी लोकसभा निवडणुकीत केले. याशिवाय अल्पसंख्याक समाजात असुरक्षिततेची भावना निर्माण करण्यात विरोधकांना यश आले असेही सुनिल तटकरे म्हणाले. आदिवासी समाजाचे प्रमाण जास्त असलेल्या या अकोले तालुक्यात सिंचनाच्या माध्यमातून अनेक कामे जलसंपदा मंत्री असताना अजितदादा पवार आणि मी निळवंडे धरणाच्या माध्यमातून या परिसरात झाली असल्याची आठवणही सुनिल तटकरे यांनी करुन दिली. अजितदादांनी जे केले ते चूक हा जो अपप्रचार आणि खलनायक ठरवण्याचा प्रयत्न विरोधकांकडून केला जात आहे त्याला प्रत्युत्तर देण्याची गरज आहे. याचे भांडवल विरोधकांनी लोकसभा निवडणुकीत करण्याचा प्रयत्न केला मात्र त्याचा फायदा विरोधकांना झाला नाही. लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी सहानुभूती आणली त्यात ते काहीप्रमाणात यशस्वीही झाले परंतु ती सहानुभूती आता टिकणार नाही आता अजितपर्व नावाने सहानुभूती निर्माण करायची आहे असे आवाहन सुनिल तटकरे यांनी यावेळी केले.

# आता दर शनिवारी विद्यार्थ्यांच्या दफ्तराला सुट्टी : राज्य सरकारचा निर्णय

## शनिवारी शाळेत दफ्तर नेण्याची गरज नाही


आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** शैक्षणिक सत्र 24 -25 येत्या 1 जुलै पासून सुरू होत असून नवीन शैक्षणिक सत्रामधे शालेय विद्यार्थ्यांमधे असलेल्या सुप्त गुणांना वाव मिळावा, वर्तन जबाबदारी बाबत जागरूकता निर्माण व्हावी, चांगल्या सवयी, सहकार्य वृत्ती, नेतृत्व गुणांचा विकास व्हावा, या उद्दात्त हेतुने सर्व शाळांमध्ये येत्या शैक्षणिक वर्षापासून पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक शनिवारी 'आनंददायी शनिवार' हा उपक्रम राबविण्याचा निर्णय राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. राज्य सरकारच्या शिक्षण विभागाने घेतलेल्या सदर निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या दप्तराला शनिवारी सुटी भेटणार आहे. तर्कसंगत विचार आणि कार्य करण्यासाठी सक्षम असणाऱ्या तसेच करुणा, सहानुभुती, साहस, लवचिकता, वैज्ञानिक चिंतन, रचनात्मक, कल्पनाशक्ती, नैतिक मुल्ये असणाऱ्या उत्तम मनुष्यत्वाचा विकास हा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा महत्त्वाचा उद्देश आहे. लहान वयातही विद्यार्थ्यांना ताणतणाव, उदासिनता, नैराश्य या मानसिक विकारांना सामोरे जावे लागत असल्याने त्या पार्श्वभुमीवर शालेय जीवनात 'आनंददायी शानिवार' हा उपक्रम राबविल्यास विद्यार्थ्यांची शिक्षणाची अभिरुची वाढीस लागेल, त्याचा निश्चितच विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर चांगला परिणाम होईल. विद्यार्थ्यांची शाळेत होणारी गळती, अनुत्तीर्ण होण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. प्रत्येक शनिवारी विद्यार्थ्यांच्या दप्तराला सुट्टी देण्या संदर्भातील शालेय शिक्षण विभागाचे पत्र प्राप्त झालेले आहे. राज्य पातळीवर विविध समित्या ह्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यास करत असतात.'त्याचाच एक भाग म्हणून आनंददायी शनिवार 'या उपक्रमाचा समवेश करण्यात आला असून निश्चितच शालेय विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होईल. आणि अभ्यासातील रूची वाढण्यास मदत होईल.



नवीन शैक्षणिक सत्र 24–25 सुरू झाल्यानंतर या उपक्रमाची अंमलबजावणी होणार आहे. शाळांना शनिवारी कोणत्याही विषयाचे वर्ग घेता येणार नाहीत. त्यामुळे विद्यार्थी शनिवारी शाळेत आल्यानंतर त्यांची अभ्यासापासुन सुटका होणार आहे. शाळेचा संपुर्ण वेळ हा आनंददायी शनिवारसाठीच करायचा आहे, असे स्पष्ट आदेशही शिक्षण विभागाने दिले आहेत. आठवड्यातून दोन दिवस विद्यार्थ्यांना अभ्यासापासुन विश्रांती मिळाल्यानंतर मात्र ते सोमवारी नियमित शाळेत येतील.
**बद्रीनारायण एल. कोकाटे**
**गटशिक्षणाधिकारी पं. स. रिसोड**





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


एकदा अकबराने बिरबलाला तीन प्रश्न विचारले होते. घोडा का अडला ? भाकरी का करपली ? पान का सडले ? आणि अकबराने बिरबलाला या तिन्ही प्रश्नांचं उत्तर फक्त तीन शब्दात द्यायला सांगितले. चतुर बिरबलाने पटकन सांगितले, ' वेळेवर न फिरवल्यामुळे. ' किती सुदंर उत्तर आहे नाही ..! आपण ही लहान मुलांची गोष्ट म्हणून बऱ्याच वेळेला सोडून देतो. पण त्यात किती मतितार्थ भरला आहे ! प्रत्येक गोष्ट वेळच्या वेळी करायला हवी. भाकरी वेळीच फिरवली नाही, तर ती करपेल. पान सडेल आणि घोडा अडून राहील. हा न्याय आपल्या जीवनाला सुद्धा लागू होतो. आज आपले आरोग्य बिघडले आहे. दवाखान्यांमध्ये गर्दी वाढते आहे, इतकी की नवीन पेशंटसाठी जागा नाही. अनेक आजार वाढले आहेत. कोणालाही विचार की आज असे का होत आहे ? तो लहान मुलगा असला तरी आपल्याला सांगेल की, ' अहो काका, टेन्शन किती वाढलंय हल्ली ! शिवाय प्रदूषण केवढं वाढलंय ..! मग होणारच ना आजार. ' खरे आहे. हे सांगायला काही कोणा फार मोठ्या तज्ज्ञाची जरुरी नाही. मग पुन्हा अकबरासारखाच प्रश्न मनात येतो. कोणी वाढवले हे ताणतणाव, कोणी वाढवलं प्रदूषण ?




## हितगुज



पुष्प ९४वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

### मुखाने नाम, हाताने प्रपंचाचे काम

समजा, एक यंत्र आहे, त्यात पुष्कळ चक्रे आहेत. एखाद्याने त्यातले एखादेच चक्र चालू करु म्हटले तर ते चालू होईलच असा भरवसा नाही. पण त्या सर्व चक्रांचा संबंध असणारी कळ दाबली, तर मात्र बिनतक्रार आणि अत्यंत अल्प प्रयासाने ते यंत्र सहज चालू करता येईल. त्याप्रमाणे नामस्मरण ही कळ धरली तर ‘सत्कर्मरुपी’ सर्व चक्रे एकदम फिरु लागून आपले काम निश्चितपणे आणि सुलभपणे होईल. व्यवहारात आपण पाहतोच की एखादी गोष्ट समर्थनीय नसली तरी करायचा निश्चय केला की मनुष्य ती करतोच. मग ‘श्री स्वामी समर्थ’ मंत्राच्या स्मरणाचा जर निश्चय केला तर का नाही होणार? जग हे अनेक मोहक वस्तूंनी भरले आहे. त्या मिळविण्याचा आपण प्रयत्न करतो. म्हणून महाराजांजवळ अशी प्रार्थना करावी की, ‘महाराज, मोहक वस्तू मला दाखवूच नका, माझे ज्यात खरे हित आहे तेच मला दिसू द्या, तेच मला ऐकू द्या, त्याचेच मला स्मरण होऊ द्या आणि त्याचीच मला गोडी लागू द्या’. प्रल्हाद, द्रौपदी यांसारख्या भक्तांनी देवाजवळ काय मागितले? तेच आपण मागावे आणि त्यांनी निष्ठा ठेवली तशीच आपणही ठेवावी. त्यांच्या ठिकाणी जसे वैराग्य होते तसे आपल्या ठिकाणी आणण्याचा प्रयत्न करावा. प्रयत्न करीत असताना प्रथम चुका होतील, पण त्या झाल्या तर पश्चाताप व्हावा. मुखाने जप करावा. मनाने श्री स्वामी समर्थ महाराजांचे स्मरण करावे, हाताने प्रपंचाचे काम करावे, आणि अंतःकरणात समाधान ठेवावे.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## गोरक्षनाथ

आधुनिक केसरी

त्रिंबकेश्वर हे नाथ संप्रदायाचे उगम स्थान मानले जाते. याच ठिकाणी गुरु गोरक्षनाथांनी ९ नाथांना व ८४ सिद्धांना उपदेश केला.



ते उपदेश केलेले ठिकाण म्हणजे अनुपम शीळा होय. ऋषींना घेऊन गुरु गोरक्षनाथ कौलगिरीकडे गेले तेथे त्यांना एका शिळेवर सर्व ऋषींना बसवून उपदेश दिला त्यातील ९ शिष्यांनी तो जसाचे तसा ग्रहण केला त्यांना नवनाथ म्हणतात. ते नवनाथ मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, जालिंदरनाथ, कानिफनाथ, भर्तरीनाथ, रेवणनाथ, नागनाथ व चरपटीनाथ. त्या शिळेला अनुपम शिळा म्हणतात. आदि गुरू दत्तात्रेय आणि गोरक्षनाथ यांचा संबंध पाहिला आहेच. भगवान दत्तात्रेय आणि सिद्धाचार्य गोरक्षनाथ यांची भेट गिरनार पर्वतावर झाली असल्याचे प्रसिध्द आहे. याच ठिकाणी गोरक्षनाथांवर दत्तात्रेयांनी सिद्धीसामर्थ्य दाखवून अनुग्रह केला. आज या स्थानाला "कमंडलू तीर्थ’ या नावाने महत्त्व प्राप्त झाले आहे. गोरक्षनाथांनी येथील शिखरावरील दत्तपादुकांचे दर्शन घेतल्याची कथा प्रसिद्ध आहे. दत्तांनी त्यांना या ठिकाणी उन्मत पिशाचवत् अशा दिगंबर, भस्मचर्चित, जटाजूटधारी अशा स्वरूपात दर्शन दिले. नाना सिद्धींचे चमत्कार दाखवून गोरक्षनाथांवर दत्तात्रेयांनी याच ठिकाणी कृपा केली. गोरक्षनाथांच्या परंपरेतील बहुतेक सर्व नाथांचा दत्तात्रेयांशी संबंध असल्याने व दत्तपंथातील अनेक महत्त्वाच्या बाबी नाथपंथाने विकसित केल्या असल्याने श्रीगोरक्षनाथांच्या चरित्राची रूपरेखा पाहणे अगत्याचे आहे. नाथसिद्धांच्या ज्या विविध नामावली सध्या उपलब्ध आहेत त्यांत गोरक्षनाथांचा उल्लेख येतो. मत्स्येंद्रनाथांचे शिष्य म्हणून गोरक्षनाथांचा उल्लेख येतो. मत्स्येंद्रनाथांना म्हणजे आपल्या गुरुंना स्त्रीराज्यातून म्हणजे वामाचारी पंथातून मुक्त करणारा एक थोर सिद्ध पुरुष म्हणूनही गोरक्षनाथांचा काल व त्यांचे जीवनवृत्त यांची विश्वसनीय माहिती उपलब्ध नाही. मत्स्येन्द्रनाथ व गोरक्षनाथ यांचे कार्य अकराव्या शतकातले असावे, असा संशोधकांचा तर्क आहे. या योगी सिद्धांचे आयुर्मान अनेकदा अवघड काम होऊन बसले आहे. या दोनही सिद्धपुरुषांचे अनेक अवतार असल्याचेही सांगतात. गोरक्षनाथांच्या जन्मासंबंधी एक आख्यायिका अशी की, एका पुत्रकांक्षिणी स्त्रीस महादेवांनी विभूतीभस्माचा प्रसाद दिला. या स्त्रीने अश्रद्धपणे तो प्रसाद शेणाच्या उकिरड्यावर टाकून दिला. बारा वर्षांनी आपल्या प्रसादाचा परिणाम पाहाण्यासाठी महादेव आले तेव्हा त्यांनी राखेच्या ढिगाऱ्यातून हाक मारून "गोरक्ष” नाथास उभे केले. कधी या कथेतील आदिनाथाऐवजी म्हणजे मत्सेन्द्रनाथांचे नाव येते. ही पुत्रकांक्षिणी स्त्री ब्राह्मण असल्याचे सांगतात. मत्सेंद्रनाथ व गोरक्षनाथ यांनी नेपाळमध्ये अनेक प्रकारचे चमत्कार केले. नेपाळी परंपरेप्रमाणे मत्स्येंद्रनाथ हे गोरक्षनाथांचे गुरू आहेत, तर गोरक्षसिद्धांतानुसार गोरक्ष हे प्रत्यक्ष शंकराचेच पुत्र वा शिष्य आहेत. गोरक्षनाथांचे जन्मस्थान नेपाळ, पंजाब, गोरखपूर, यांपैकी कुठेतरी असावे.



आधुनिक केसरी

### दातृत्व सागर | आनंदाचा ||

क्षणोक्षणी करी | द्रव्याचा विचार ||
पापाचा संचार | त्याचे ठायी ||१||
माय बाप सारे | न जाणे आणिक ||
द्रव्य अतिरेक | घात करी ||२||
ध्यानीमनी सदा | स्वार्थाचा विचार ||
अंध तो मुजोर | जाण पापी ||३||
ज्याचे मुखी नाही | आले हरिनाम ||
काय करी दाम | अंतकाळी ||४||
जाण मूलमंत्र | कष्टाची भाकर ||
दातृत्व सागर | आनंदाचा ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्ववेंद, मनामनांत स्ववेंद, जनमनांत स्ववेंद !

योग कहत हैं जोड़ को,
योग कहत हैं सन्धि ।
योग रहस्य उपाय में, जीव ब्रह्म की सन्धि
।।११।।(स्ववेंद चतुर्थ मण्डल द्वितीय अध्याय) ०४/०२/११
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
दोन पदार्थांच्या संबंधालाच योग म्हणतात. योग आणि सन्धि या दोन्ही शब्दांचा अर्थ एकच आहे. योगाच्या भेदीक उपायाने जीव आणि ब्रह्माचा ( परमेश्वर) संबंध होतो.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.



स्ववेंद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

## देहान्तनिरूपण

आधुनिक केसरी

एक वेळ अशी येते तुम्ही सचोटीने वागता तेव्हा तुमचे आचार, विचार समाजाला पटायला लागतात. माझं काल तसचं झालं कालची निर्जला एकादशी निमित्त वेगवेगळ्या प्रकारच्या लोकांनी विचार मांडायला सांगितले त्यामुळे आपला रोजचा दासबोध लिहायला वेळ मिळाला नाही. समर्थांच्या पायाशी मी विनम्रपणे नतमस्तक होते आणि पुढचा समासात कोणता बोध घ्यायचा यांचा अभ्यास करते. तर मित्रांनो आपण आत्तापर्यंत अनेक विषयांवर चर्चा केली दासबोधाचे समास अभ्यासत असताना समर्थांनी किती पुढचा विचार करून दासबोध लिहिला हे पहायला मिळते. मन शुध्द पाहिजे तर मी काय केले पाहिजे प्राण,वासना,मन व वृत्ति हे एकाच देहाचे वेगवेगळे घटक आहेत.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## निरूपण


आधुनिक केसरी

भृकुटीस घालून मिठी । पाहातां क्रोधें तेंहि उठी ।
आपण हास्य करितां पोटीं । तेंहि आनंदे ॥ १८॥
जैसा भाव प्रतिबिंबला । तयाचाचि देव जाला ।
जो जैसें भजे त्याला । तैसाचि वोळे ॥ १९॥
भावें परामार्थाचिया वाटा । वाहाती भक्तीचिया पेंठा ।
भरला मोक्षाचा चोहाटा । सज्जनसंगें ॥ २०॥
भावें भजनीं जे लागले । ते ईश्वरी पावन जाले ।
भावार्थबळें उद्धरिले । पूर्वज तेहीं ॥ २१॥
आपण स्वयें तरले । जनासहि उपेगा आले ।
कीर्तिश्रवणें जाले । अभक्त, भावार्थी ॥ २२॥
धन्य तयांची जननी । जे लागले हरिभजनीं ।
तेहिंच येक जन्म जनीं । सार्थक केला ॥ २३॥
तयांची वर्णू काय थोरी । जयांचा भगवंत कैवारी ।

## 'मी कोणीतरी आहे' ही वृत्ती घातक

आधुनिक केसरी

पुष्कळ लोकांच्या अडचणी ऐकून असा विचार मनात आला, की जगातल्या सर्व दुःखांचे मूळ, देहदुःख आणि पैशाची टंचाई ह्यांत मुख्यतः साठविलेले आहे. या दोन्ही गोष्टींत जर मदत करता आली तर पुष्कळ लोकांना सुखी करता येईल असे वाटू लागले, आणि त्या दृष्टीने विचार सुरू झाला. पैशाचा विचार करता असे दिसले की, आपण लंगोटी घातलेली, जवळ पैसा नाही, आणि त्याचा लोभही नाही. आता दुसऱ्याला पैसा द्यायचा म्हटले, म्हणजे त्याचा प्रथम आपल्या ठिकाणी लोभ उत्पन्न केला पाहिजे, तरच तो मिळवावा अशी बुद्धी उत्पन्न होईल; नंतर पैसे मिळविणे, आणि त्याच्यानंतर तो गरजवंताला देणे. पण हे करणे वाटते तितके सोपे नाही. कारण दुसऱ्याला देण्याकरिता पैसा मिळवावा म्हणून जो लोभ प्रथम आपल्या ठिकाणी उत्पन्न केला, तोच पैसा सोडताना आपल्या आड येईल, आणि दुसऱ्याला पैसा देण्याची बुद्धी मारील. म्हणजे परिणाम असा होणार की, दुसऱ्याला पैसा तर देता आला नाहीच, पण आपल्या ठिकाणी मात्र



आधी नसलेला पैशाचा लोभ उत्पन्न झाला. ह्यात दुसऱ्याचे काम तर नाहीच, आणि स्वतःचे मात्र नुकसान झाले. दुसरी बाब देहदुःखाची. ज्याची देहबुद्धी मेलेली आहे, त्याला दुसऱ्याच्या देहदुःखाची जाणीव होऊ शकत नाही. म्हणजे, दुसऱ्याचे देहदुःख नाहीसे करावे अशी बुद्धी होण्याकरिता स्वतःच्या ठिकाणी देहबुद्धी जागृत करावी लागेल. समजा, इतके केले, आणि दुसऱ्याचे देहदुःख निवारले, तरी त्याला पुनः देहदुःख भोगावे लागणारच नाही असे कसे होईल ? आज झालेली पोटदुखी बंद केली तरी कालांतराने त्याला ताप किंवा इतर आजार येणारच नाही असे कसे होऊ शकेल ? म्हणजे देहदुःख कायमचे टाळता येत नाही, आणि पैसाही देता येत नाही. अशाने जगाला सुखी तर करता येत नाहीच, पण आपल्या स्वतःच्या ठिकाणी मात्र नसते दोष उत्पन्न केल्यामुळे स्वतःची अवनती केल्यासारखे होऊन, नुकसान मात्र पदरात पडते. म्हणून रामाची प्रार्थना केली की, असल्या गोष्टी करण्याची शक्ती आणि बुद्धी मला देऊ नकोस. बालपणाची सरल वृत्ती नाहीशी व्हायला दोन मोठी कारणे आहेत. एक पैसा, आणि दुसरे विद्या. दोन्हींपासून ‘ मी कुणीतरी श्रेष्ठ आहे ’ ही वृत्ती उत्पन्न होते, आणि ती घातक असते. ‘ मी कुणीतरी आहे ’ असे वाटण्यापेक्षा ‘ मी कुणाचा तरी आहे ’ असे वाटणे हिताचे आहे. जगातले अत्याचार, अनीती, अधर्म, असमाधान या सर्वांचे कारण हेच की, मनुष्य जास्त लोभी झाला आहे. देवाची ज्याच्यावर कृपा आहे त्याला तो पोटापुरता पैसा देतो, पण ज्याची परीक्षा पहायची त्याला भगवंत जास्त पैसे देतो.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरूवार, २० जून २०२४
adhunikkesari.com

# समाजाच्या जडणघडणीत रयतचा मोठा वाटा : रावसाहेब म्हस्के

आधुनिक केसरी न्यूज

**लोहगाव :** रयत शिक्षण संस्था ही कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या समर्पण आणि त्यागातून उभी राहिलेली असून महात्मा गांधी विद्यालयाच्या वैभव आणि गुणवत्तेसाठी पालकांनी जागरुक राहावे. सर्वसामान्य विद्यार्थी घडविण्यात आणि समाजाच्या जडणघडणीत रयतचा मोठा वाटा आहे, असे प्रतिपादन जनरल बॉडी सदस्य रावसाहेब म्हस्के यांनी केले.

प्रवरानगर येथील महात्मा गांधी शैक्षणिक संकुलात शाळा व्यवस्थापन समिती आणि पालक शिक्षक संघ सभेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रावसाहेब म्हस्के हे होते. सुरुवातीला रावसाहेब म्हस्के, प्राचार्य अंगद काकडे, गणेश चेचरे, महेश वाकचौरे, मुख्याध्यापिका सिंधू क्षेत्रे यांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून वंदन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्र. पर्यवेक्षक संजय ठाकरे यांनी केले. यावेळी अन्वर शेख, अलका आहेर, शंकर जगधने, अनिता तांबे, कल्याणी खोसे, अर्चना खोसे, भाऊसाहेब खेमनर या पालकांनी विद्यालयातील भौतिक सुविधा आणि गुणवत्तेविषयी चर्चा केली. याप्रसंगी महेश वाकचौरे, मुख्याध्यापिका सिंधू क्षेत्रे, संगीता उगले यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थी, पालक व शिक्षक यांचा समन्वय सुयोग्य सुसंवाद आणि निकालाची परंपरा व्यक्त केली. प्राचार्य अंगदकाकडे यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी दिली जावी. विद्यार्थ्यांना मोबाईल व मोटारसायकल देऊ नये तसेच पालकांच्या विविध मागण्यांचे स्वागत करून आश्वासित केले. यावेळी उपप्राचार्या अलका आहेर, सुभाष भुसाळ यांच्यासह पालक शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी सोहोनी यांनी केले. तर आभार डॉ. शरद दुधाट यांनी मानले.



# दिंड्यांच्या अनुदानावरुन राजकारण पेटले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आषाढी वारीमध्ये सहभागी होणाऱ्या दिंड्यांना राज्य शासनाकडून यंदा प्रथमच 20 हजार रुपयांचे अनुदान जाहीर करण्यात आले आहे. मात्र मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या या निर्णयाला अनेक वारकऱ्यांनी विरोध केला आहे. तर मुख्यमंत्र्यांनी घेतलेला निर्णय हा गोरगरीब वारकऱ्यांसाठी असून, या विरोधामागे अप्रत्यक्ष राजकारण होत असल्याचा आरोप धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे प्रदेशाध्यक्ष अक्षय महाराज भोसले यांनी केला आहे.

अनुदानाला वारकऱ्यांचा विरोध, देवस्थानाचे समर्थन शासनाने जाहीर केलेल्या निधीला अनेक वारकऱ्यांना विरोध दर्शवला असताना, दुसरीकडे मंदिर देवस्थानाने मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या या निर्णयाचं स्वागत केले आहे. मुक्ताई संस्थानच्या वतीने आषाढी एकादशीला मुख्यमंत्र्यांचा पंढरपूरमध्ये जाहीर सत्कार करण्यात येणार असल्याचे अक्षय महाराज भोसले यांनी स्पष्ट केलं आहे. दरवर्षी आषाढी एकादशीला श्री विठ्ठल-रुक्मिणीची पूजा करण्याचा मान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि त्यांच्या पत्नीचा असतो. गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात ही परंपरा आहे. परंतु, यंदा याला जोडूनच एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. या वर्षी आषाढीच्या शासकीय महापूजेस 10 मानाच्या पालखी सोहळा प्रमुखांना निमंत्रण दिलं जाणार आहे. मुख्यमंत्र्यांसोबत पालखी प्रमुखांनाही महापूजेचा मान मिळणार आहे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी  हा मोठा निर्णय घेतला आहे. यंदा शासनाने पालखी सोहळ्यातील दिंड्यांना 20 हजार रुपये अनुदान देण्याच्या निर्णय घेतला होता. लोकसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील वारकरी संप्रदायाला खुश करण्यासाठी घेतलेल्या या निर्णयाचे स्वागत वारकरी संप्रदायाने केलं होतं. त्यानंतर आता दुसरा मोठा निर्णय घेण्यात आला आहे.

# जातीचा संघर्ष थांबवा; बच्चू कडूंचा सल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** राज्यात ओबीसी आणि मराठा आरक्षणाचा मुद्दा अत्यंत कळीचा होऊन गेला आहे. अशातच मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला एक महिन्याचा वेळ दिला असून वेळीच आमच्या मागण्या मान्य करण्याचे आवाहन जरांगे पाटील यांनी केले आहे. तर दुसरीकडे ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी ओबीसींच्या आरक्षण बचावासाठी उपोषणाचे हत्यार उगारले आहे. दरम्यान लक्ष्मण हाकेंच्या उपोषणाचा आचा सातवा दिवस आहे. त्यामुळे राज्यांमध्ये सध्या मराठा विरुद्ध ओबीसी असंच काहीसे चित्र निर्माण झालं आहे. अशातच यावर भाष्य करताना प्रहारचे सर्वेसर्वा आणि आमदार बच्चू कडूंनीही यांनी  जातीचा संघर्ष थांबावून छगन भुजबळ आणि मनोज जरांगे पाटील यांनी एकत्र येऊन लढण्याचा सल्ला दिला आहे.

राज्यात सध्या ओबीसी विरुद्ध मराठा असा वाद सुरु आहे. हे थांबलं पाहिजे. एकाकडे कोकणातल्या मराठ्यांनी या मागणीला विरोध दाखवला आहे. तर मराठवाड्यातल्या मराठा ओबीसी मध्ये यायला तयार आहेत. सध्याच्या आरक्षणात वाढ करून यावर तोडगा काढावा, असं माझं मतं आहे. तसेच ही लढाई भुजबळ आणी जारांगे यांनी एकत्र येऊन लढावी आणि हा जातीचा संघर्ष थांबवावा. यासाठी मी स्वतः भुजबळ आणी जारांगे यांची भेट घेणार असल्याचे मत ही  बच्चू कडूंनी बोलताना व्यक्त केले आहे.

देशात नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुका आणि त्यांच्या निकालानंतर संघ नेतृत्वाची जाहीर भूमिका पहिल्यांदाच सर्वांसमोर आली. संघाच्या प्रशिक्षण प्रणालीत अत्यंत महत्वाच्या कार्यकर्ता विकास वर्गाच्या समारोपीय सोहळ्यात सरसंघचालक डॉ. मोहन भागवत (Mohan Bhagwat) यांनी सर्वच राजकीय पक्षांना कानपिचक्या दिल्या. यावर बोलताना बच्चू कडू म्हणाले की, आर एस एसने आकडेवारीवर बोलण्यापेक्षा परिणामावर बोलायला हवं होतं. जेव्हा अजित दादांना युतीत घेतलं तेव्हा बोलायला पाहिजे होतं. आता बोलणे योग्य नाही. एकीकडे नैतिकतेवर बोलायचं आणी दुसरीकडे आकडे सांगायचे हे योग्य नसल्याचेही बच्चू कडू म्हणाले.

आज शिवसेना पक्षाचा वर्धापन दिन आहे. पक्षात उभी फुट पडल्यानंतर उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि  एकनाथ शिंदेची शिवसेने कडून आज हा दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. यावर भाष्य करताना बच्चू कडूंनी खंत व्यक्त केली आहे. शिवसेनेबाबत जे झालं ते वाईटच झालं. पण आता त्याला काही इलाज नाही. असे म्हणत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहे.



## धनाढ्य देश सोडणार

आधुनिक केसरी

भारतात श्रीमंताची संख्या वाढत चालली असली तरी भारताला सोडून जाणाऱ्या श्रीमंत कोट्यधीशांचीही संख्या वाढत आहे. यावर्षी ४,३०० भारतीय कोट्याधीश नागरिक भारताला राम राम ठोकून इतर देशात जाणार असल्याचा ताजा अहवाल समोर आला आहे. यापैकी बरेचसे धनाढ्य आखाती देशांची निवड करण्याची शक्यताही या अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. लंडनच्या 'हेन्ली अँड पार्टनर्स' या गुंतवणूक सल्लागार संस्थेने या संबंधी एक अहवाल प्रकाशित केला आहे, ज्यामध्ये ही माहिती दिली. मागच्यावर्षी ५,१०० कोट्यधीश भारतीय नागरिक देश सोडून इतर देशांत स्थलांतरित झाले होते, असा अहवाल याच संस्थेने दिला होता. वेगाने अर्थव्यवस्थेत प्रगती होणाऱ्या देशांमध्ये भारताचा समावेश होतो. चीन आणि युकेनंतर कोट्यधीशांचे स्थलांतर होणाऱ्या देशांमध्ये भारताचा आता तिसरा क्रमांक लागत आहे. तसेच सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशांमध्ये भारताना चीनलाही मागे टाकले आहे. मात्र कोट्यधीशांच्या संख्येत भारत अजूनही चीनच्या मागे आहे. भारतात चीनपेक्षा ३० टक्के कमी कोट्यधीश आहेत. भारत दरवर्षी हजारो कोट्यधीश गमवत आहे. यातील बरेचसे लोक आखाती देशांना आपलेसे करत आहेत. कोट्यधीश भारताबाहेर गेल्यानंतर त्यांच्याबरोबर ते संपत्तीचेही स्थलांतर करतात. स्थलांतरामुळे अनेक कोट्यधीश नागरिक भारताने गमावले असले तरी आर्थिक प्रगतीचा वेग वाढल्यामुळे आणखी कोट्यधीश निर्माण करण्यात भारताला यश आलेले आहे, असेही या अहवालात नमूद केले गेले आहे. या अहवालात असेही नमूद केले आहे की, कोट्यधीश नागरिक स्वतः जरी स्थलांतरीत होत असले तरी त्यांच्या व्यवसायाचे केंद्र आणि त्यांचे भारतातील घर मात्र कायम ठेवत आहेत. यामुळे त्यांना आर्थिक घेवाणदेवाण सोपे जाते. जगभरातील १,२८,००० कोट्यधीश नागरिक २०२४ या वर्षात स्थलांतरीत करण्याच्या तयारीत आहेत. युएइ आणि युएसए या देशांमध्ये कोट्यधीश स्थलांतरित होण्यास प्राधान्य देत आहेत. स्थलांतर करण्याची अनेक कारणे सांगितली जात आहेत. त्यापैकी सुरक्षितता, आर्थिक स्थैर्य, करांमध्ये सवलत, निवृत्तीनंतरचे आयुष्य, नव्या व्यावसायिक संधी, चागंल्या जीवनमानाची अपेक्षा, मुलांसाठी चांगल्या शिक्षणाच्या संधी, आरोग्याच्या सुविधा आणि चांगल्या दर्जाचे आयुष्य जगण्यासाठी कोट्यधीश स्थलांतरित करत आहेत.

## कुप्पाहळ्ळी सुदर्शन : एक द्रुष्टे सरसंघचालक



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला सामाजिक अभियांत्रिकीचे तत्वज्ञान प्रदान करून घरवापसीला पोषक वातावरण प्राप्त करून देणारे के. सुदर्शन हे एक द्रुष्टे विचारवंत होते. त्यांनी मध्य व ईशान्य भारतामध्ये संघकार्याचा निष्ठेने विस्तार केला. आज दक्षिण भारतात संघकार्याचा केरळपर्यंत उल्लेखनीय विस्तार झाला आहे. त्याचे श्रेय के सुदर्शन यांच्यासारख्या शेकडो कार्यकर्त्यांच्याकडे जाते.... १८ जून रोजी सुदर्शन यांची जयंती संपन्न झाली. त्या निमित्ताने विशेष लेख.**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जडणघडणीत गेल्या शतकामध्ये ज्यांचा महत्त्वाचा वाटा होता अशा सरसंघचालकापैकी एक हिंदू राष्ट्रवादाची प्रवर्तक म्हणून श्री. सुदर्शन यांचे योगदान निश्चितच इतिहासात मोलाची भर टाकणारे ठरले आहे. त्यांच्या समग्र जीवनकार्याचे आकलन केले असता, त्यांचा जाज्वल्य राष्ट्रवाद, समर्पित सेवाभावी वृत्ती आणि हिंदुत्व चळवळीमध्ये त्यांनी आणलेले नवचैतन्य विशेष बाब म्हणून नोंदवावे लागेल. जीवनकार्याचा आलेख अभ्यासला असता, त्यांच्या समग्रतेचे मर्म हे संघतत्वज्ञानात असल्याचे दिसून येते. विसाव्या शतकातील आधुनिक भारताची वाटचाल पहात असताना, त्यांनी केलेले राजकारण व समाजकारणाचे मर्म विशेषत्वाने लक्षात घ्यावे लागेल.

**सांस्कृतिक राष्ट्रवादाचे नवचैतन्यः** गेल्या दोन दशकातील हिंदू राष्ट्रवादी चळवळीमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे योगदान मोठे आहे. या संघटनेला सातत्याने नवे रूप देण्याचे कार्य डॉ. हेडगेवार यांच्या नंतर मा. स. गोळवलकर गुरूजी, बाळासाहेब देवरस, प्रा. राजेंद्र सिंघ यांच्याप्रमाणेच के. सुदर्शन यांच्याकडेही जाते. संघाच्या मुशीतून तप्त सोन्याप्रमाणे तावून सुलाखून निघालेले त्यांचे व्यक्तिमत्व होते. डॉक्टरांचा ध्येयवाद, गुरूजींचे तत्वज्ञान आणि देवरसांची समरसता यांचा अनोखा संगम सुदर्शन यांच्या विचार व कार्यामध्ये प्रकट होतो. त्यांची भाषणे, लेख व वेळोवेळी त्यांनी मांडलेले विचार यांचे संकलन केले असता, त्यातून त्यांचे विचार चरित्र साकारते. सुदर्शन यांचे जीवन १८ जून १९३१ ते १५ सप्टेंबर २०१२ एवढ्या आठ दशकांच्या कालखंडात एक सच्चा स्वयंसेवक ध्येयवादी कार्यकर्ता आणि संघाचे पाचवे सरसंघचालक म्हणून त्यांनी कालचक्रावर अमीट ठसा उमटविला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या जगातील सर्वात मोठ्या स्वयंसेवी संघटनेचे २००० ते २००९ या काळात सरसंघचालक म्हणून त्यांनी धुरा समर्थपणे वाहिली. त्यांचा जन्म एका हिंदू कुटुंबात मध्यप्रदेशातील रायपूर येथे झाला. सध्या रायपूर हे छत्तीसगडची राजधानी आहे. पण सुदर्शन हे मूळचे कर्नाटकातील कुप्पहळ्ळी या गावचे असल्यामुळे तेथील रिवाजाप्रमाणे त्यांच्या कुटुंबाचे आडनाव कुप्पाहळ्ळी सितारामैय्या सुदर्शन अशा नावाने ते ओळखले जातात. खऱ्या अर्थाने त्यांचे जीवन राष्ट्रीय स्वरूपाचे होते. मूळ कर्नाटकाचे असूनही वडिलांच्या सेवेमुळे ते मध्य भारतात जन्मले आणि क्रमाक्रमाने व कलाकलाने त्यांचे जीवनपुष्प विकसित होत गेले. रायपूरमध्ये शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी जबलपूर अभियांत्रिकी महाविद्यालयातून टेलीकम्युनिकेशन या विषयातील आभियांत्रिकी ऑनर्स पदवी संपादन केली. त्यांचे आई-वडील कर्नाटकातील मांडया जिल्ह्यातील कुप्पाहळ्ळी गावाचे रहिवासी होते. ते ९ वर्षाचे होते तेव्हा त्यांनी पहिल्यांदा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत प्रवेश घेतला. एक सच्चा स्वयंसेवक म्हणून त्यांनी संघकार्याला वाहून घेतले. १९५४ मध्ये त्यांची प्रचारक नियुक्ती करण्यात आली. त्याआधी स्वयंसेवक, मुख्य शिक्षक, तालुका संघचालक, जिल्हा कार्यवाह इत्यादी पदे त्यांनी भूषविली. अखिल भारतीय पातळीवर काम करणाऱ्या अनेक प्रचारकांशी त्यांची ओळख झाली. आपणही प्रचारक म्हणून देशाची सेवा करावी असा त्यांच्या मनाने निश्चय केला.

**प्रचारकाचे नैष्ठिक जीवनः** प्रचारक या नात्याने काम करताना त्यांनी संघकार्याचा ध्यास घेतला. दूरवरच्या प्रदेशात संघशाखांचा विस्तार करताना त्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात केली. आपणहून स्विकारलेला कंटकमय मार्ग आहे, तो पूर्ण केल्याशिवाय समाधान होत नाही हे ओळखून ते रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग या संतवचनाप्रमाणे सेवा, संघर्ष व समर्पण करीत राहिले. प्रचारक म्हणून त्यांची पहिली नियुक्ती मध्यप्रदेशातील रायगड जिल्ह्यात



करण्यात आली. आता हा जिल्हा नव्या छत्तीसगड राज्यात मोडतो. प्रचारक या नात्याने झंझावती दौरे, भेटीगाठी, बैठका, प्रवास, चर्चा, विचारमंथन या मार्गाने त्यांची अखंड वाटचाल चालू राहिली. असा ध्येयवादी तरूण प्रचारक मागे पुढे न पाहता झोकून देऊन कार्य करीत होता. गुरूजींची नजर त्यांच्यावर पडली आणि सुदर्शन यांचे दायित्व वाढत गेले. १९६४ मध्ये त्यांना अगदी तरूण वयातच मध्य भारताचे प्रांत प्रचारक असे दायित्व सोपविण्यात आले. सततचा प्रवास, संघटन कार्य, सेवाकार्याचे नियोजन करीत असताना त्यांनी मागे वळून पाहिले नाही. त्यांच्या कार्याचा सपाटा एवढा मोठा होता की, कार्यकर्ते थक्क होत असत. त्यांची ऊर्जा व उत्साह तरूणांनाही लाजविणारा होता.

प्रचारक या नात्याने प्रवास करताना ते काटेकोर वेळापत्रक पाळत. कार्यकर्त्याच्या घरी निवास करताना त्याच्या कुटुंबियांची विचारपूस करीत असत आणि त्या परिवाराशी असलेले संघाचे नाते अधिक घट्ट करीत असत. प्रचारक या नात्याने कार्य करताना त्यांचे अध्ययनही चालू असे. या काळात वाचन, मनन, चिंतन व लेखनावरही त्यांचा भर असे. ऑर्गनायझर, पांचजन्य इत्यादी संघाच्या पत्रिकांमध्येसुद्धा ते विचार प्रवर्तक लेख लिहित असत. भारतीय राजकारण, समाजकारण यावर ते निर्भीड मते मांडत असत. कर्मठ सनातनी दृष्टीपेक्षाही काळाप्रमाणे बदलणारा व सर्व समाज घटकांना आपलेसे करणारा, समरसता विचार ते जोपासत असत.

**निमंत्रक या नात्याने कार्यः** १९६९ साली त्यांची अखिल भारतीय संघटन प्रमुखांचे निमंत्रक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर १९७७ साली ईशान्य भारतात त्यांचा कार्यकाळ सुरू झाला. तेव्हा ईशान्य भारताच्या कानाकोपऱ्यात संघकार्याचा प्रचार व प्रसार करण्यात ते आघाडीवर राहिले. त्यानंतर दोन वर्षांनी संघाच्या बौद्ध सेल या एककाचे प्रमुख म्हणून त्यांच्यावर जबाबदारी टाकण्यात आली. पुढे ते संघाच्या थिंक टँकचे प्रमुख बनले म्हणजेच अखिल भारतीय बौद्धिक प्रमुख म्हणून त्यांनी पदभार स्विकारला. या काळात त्यांनी संघाला नवे तत्वज्ञान, नवे आदर्श आणि नवे संघटन सामर्थ्य दिले. संघकार्यातील उच्च शिखरावर कार्य करताना त्यांनी अनुभव, विचारांची स्पष्टता आणि कार्याचे नियोजन यामुळे ते सतत पुढे पुढे जात राहिले. संयुक्त

**सरचिटणीसः** १९९० साली त्यांची संघटनेच्या सहकार्यवाह पदावर नियुक्ती करण्यात आली. पुढे काही काळ शारिरीक शिक्षण प्रमुख, बौद्धिक प्रमुख ही दोन पदेही त्यांनी भूषविली. एकाचवेळी दोन पदे सांभाळण्याचा दुर्मिळ योग म्हणजे हा त्यांच्या कार्याचा गौरव म्हटला पाहिजे. त्यांच्या राष्ट्र उभारणीतील अफाट योगदानाबद्दल शोभित विद्यापीठ मिरत, उत्तर प्रदेश या संस्थेने त्यांना डॉक्टर ऑफ आर्टस् ही सन्माननीय पदवी बहाल केली. त्यांच्या कार्याचा सुगंध दरवळत राहिला. त्यांचा लौकिक वाढत राहिला आणि आता त्यांची वाटचाल श्रेष्ठ पदाच्या दिशेने चालू होती. सहकार्यवाह या पदाचे कार्य समन्वयाचे असते. प्रतिनिधी सभा, सरसंघचालक, आणि अन्य कार्यवाह व प्रमुख कार्यकर्ते यामध्ये समन्वय साधून कार्याला वैचारिक मार्गदर्शन करणे ही सहकार्यवाहची मुख्य जबाबदारी असते. ती सुदर्शन यांनी एवढ्या उत्तमप्रकारे पार पाडली की त्यांचे नाव आपला वारस म्हणून प्रा. राजेंद्र सिंघ यांनी सूचित केले आणि या पदावर कार्य करताना त्यांनी आपली निवड सार्थ होती हे उक्ती व कृतीने सिद्ध केले.

**सरसंघचालक या नात्याने कार्यः** १० मार्च २००० या दिवशी सुदर्शन हे संघाचे सरसंघचालक म्हणजे सर्वोच्च प्रमुख बनले. ते राजेंद्र सिंघ यांच्यानंतर सरसंघचालक बनले. आरोग्याच्या कारणावरून त्यांनी पायउतार होऊन पुढील काळात संघटनेची व देशाची सेवा अखेरपर्यंत केली. राजेंद्र सिंघ यांचे सहकारी एच्. व्ही. शेषाद्री यांनी त्यांची बदली करण्यास नकार दिला. कारण त्यांची प्रकृती चांगली नव्हती. सुदर्शन त्यांच्या कार्य व आदर्श परंपरामुळे सरसंघचालक पदापर्यंत पोहोचले. मार्च २००० मध्ये ते सरसंघचालक बनले.

**मौलिक योगदानः** सरसंघचालक पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी केलेल्या भाषणात अनेक सूत्रे मांडली. आपण आरंभीच्या काळात मध्य प्रदेश हे कार्यक्षेत्र का व कसे निवडले हे प्रतिपादन करताना ते म्हणाले की, प्रारंभी ते नवीन जबाबदारी घेण्यास कचरत होते. पण तत्कालीन सरसंघचालक माधव सदाशिव गोळवलकर गुरूजी यांनी त्यांचे मन तयार करण्यास मदत केली. पहिल्या भाषणात सुदर्शन म्हणाले होते की, माझ्यापेक्षा वरिष्ठ लोकांनी मला पूर्ण सहकार्य केल्यामुळे मी माझे कर्तव्य पार पाडू शकलो. हा त्यांचा विनम्र सेवाभाव या निवेदनात प्रकट होतो. स्वदेशी चळवळीचे प्रबळ समर्थक तसेच संघामधील जुन्या सनातनी कडव्या विचारापैकी एक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात असे. त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या आर्थिक धोरणावर परखड टीका केली होती. २००५ मध्ये अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले. एका तरूण नेतृत्वाकडे भाजपाची धुरा द्यावी असा त्यांचा आग्रह होता. संघ परिवारात त्यांच्या विधानाने तेढ निर्माण झाली होती. परंतु प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांनी २२ मार्च २००९ रोजी सरसंघचालक पद सोडले. सुदर्शन आपली मते ठामपणे व रोखठोकपणे मांडत असत. कोणाच्याही मताचा किंवा विधानाचा मुलाहिजा त्यांनी ठेवला नाही. त्यांनी एका पत्रकार परिषदेत आजवरच्या नेत्यामध्ये इंदिरा गांधी या श्रेष्ठ पंतप्रधान होत्या असे नमूद केले होते. सुदर्शन यांनी परधर्मात गेलेल्या हिंदू धर्मियांना पुन्हा धर्मात सामील करून घेण्यासाठी घरवापसी हे सूत्र मांडले व तसा प्रचारही केला. त्यांच्या या सिद्धांतामुळे हिंदू धर्मातील धर्मांतराची लाट थांबविली गेली. सरसंघचालक या नात्याने त्यांनी संघटनेत शिस्त, ध्येयवाद आणि बौद्धिक सामर्थ्यावर अधिक भर दिला. स्वदेशी जागरण मंचच्या कामास त्यांनी अधिक गती दिली. संघाचे खरे सामर्थ्य सेवाकार्यात आहे. संघाने अधिकाधिक सेवा प्रकल्प राबविले पाहिजेत. मध्य भारत आणि ईशान्य भारतात त्यांनी अनेक सेवा प्रकल्पांचा श्रीगणेशा केला. त्यांच्या रोखठोक व निर्भीड विचारामुळे अनेकदा मतभेद होत असत. प्रसारमाध्यमातून चर्चाही होत असे. परंतु संघाच्या थिंक टँकमधील एक आदरणीय विचारवंत म्हणून त्यांचे आदराचे स्थान होते. त्यांनी अव्वल दर्जाचे संभाषण कौशल्य हस्तगत केले होते. दाक्षिणात्य भाषांप्रमाणेच त्यांना कानडी शिवाय हिंदी, मराठी, तेलगू, मल्याळी या भाषेतही गती होती. त्यांच्या कार्यकाळात विश्व बौद्ध प्रदर्शिनी देशभर भरविण्यात आल्या. तसेच समरसता मंचाचे कार्यही विविध प्रांतातून लोकाभिमुख बनले. कुशल अभियंता या नात्याने ते संघकार्यावरसुद्धा प्रगत तंत्रज्ञान विचारांची छाप पाडू शकले. त्यांचा बुद्धिवाद विलक्षण होता. सेवाकार्याची हातोटी अपूर्व होती आणि संघटन चातुर्यही अतुलनीय होते.

**समारोपः** प्रा. राजेंद्र सिंघ यांच्याकडून सरसंघचालक पदाची सूत्रे त्यांनी घेतली आणि त्यांनी मोहन भागवत यांच्याकडे सूत्रे सोपविली. या काळात त्यांनी केलेले कार्य म्हणजे सामाजिक अभियांत्रिकीचा उत्तम नमुना म्हटले पाहिजे. सुदर्शन अव्वल इंग्रजी व अव्वल हिंदीमध्ये आपली बौद्धिक प्रमेय मांडीत असत. ते सरसंघचालक असताना संभाजीनगरमध्ये आले असताना त्यांच्याबरोबर त्यांना अजंठा व वेरूळ लेणी दाखविण्याचा योग आला होता. तेव्हा सरसंघचालकाच्या सहवासातील दोन दिवस असा लेख मी सामना दैनिकात लिहिला होता. यावेळी त्यांच्याशी अनेक विषयांवर चर्चा व विचारमंथन करण्याची संधी मला लाभली. ते भोपाळ येथे रहात असताना पुन्हा एकदा मी भेटलो तेव्हा त्यांनी अंजठा वेरूळ भेटीची आठवण काढली होती. सुदर्शन यांची कार्यपद्धती लोकशाही प्रधान, समन्वयवादी व उदारमतवादी होती. त्यामुळे संघकार्याचा मध्य भारतात, ईशान्य भारतात आणि दक्षिण भारतात चौफेर विस्तार झाला. सरसंघचालकांच्या परंपरेत राजेंद्र सिंघ हे जसे उत्तर भारताचे प्रतिनिधी होते तसे के. सुदर्शन हे संघकार्य दक्षिणेत पोहोचविणाऱ्या प्रमुख कार्यकर्त्यांपैकी एक होते. अशा प्रकारे भारतीय राष्ट्रवादी चळवळीच्या इतिहासात स्वयंप्रज्ञेने आपले स्थान निर्माण करणारे के. सुदर्शन हे एक महानायक, महादार्शनिक आणि आजच्या कार्यातून उद्याच्या भारताचे स्वप्न पाहणारे द्रुष्टे विचारवंत होते. ते काळाच्या पुढे होते. त्यामुळे त्यांच्या कार्यकाळात संघाला नवे वैचारिक सामर्थ्य लाभले. नवे दर्शन लाभले. त्यामुळे घरवापसीचा सिद्धांत ते कृतीमध्ये आणू शकले.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# प्रत्येक कारागृहातून बुद्धिबळ खेळणारे संघ तयार करणार

## अमिताभ गुप्ता : येरवडा कारागृहात आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ परिषदेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ संघटना (फिडे) व इंडीयन ऑईल यांच्या संयुक्त विद्यमाने येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे द्वितीय 'चेस फॉर फ्रीडम' या आंतरराष्ट्रीय परिषदेचे 19 ते 21 जून या कालावधीत आयोजन करण्यात आलेले आहे. राज्यातील प्रत्येक कारागृहातून बुद्धिबळ खेळणारे संघ तयार करण्यासह महिला बंदिवानांचा सहभाग वाढविण्यावर भर देण्यात येईल, असे प्रतिपादन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी कारागृह विभागाचे अपर पोलीस महासंचालक अमिताभ गुप्ता यांनी केले. या प्रसंगी कारागृह विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ.जालिंदर सुपेकर, कारागृह उपमहानिरीक्षक स्वाती साठे, येरवडा कारागृहाचे अधीक्षक सुनिल ढमाळ, इंडियन ऑईलच्या संचालक (मानव संसाधन) रश्मी गोविल, फिडेच्या सामाजिक आयोगाचे अध्यक्ष आंद्रे वोगेटलिन, अखिल भारतीय बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नितीन नारंग व फिडे प्राधिकृत परदेशी प्रतिनिधींचे शिष्टमंडळ उपस्थित होते.



'परिवर्तन प्रिझन टू प्राईड-नई दिशा' या उपक्रमांतर्गत येरवडा कारागृहाच्या बंदिवानांच्या संघाने आंतरराष्ट्रीय ऑनलाईन बुद्धिबळ स्पर्धेत सुवर्ण पदक मिळविल्याचा आनंद व्यक्त करुन श्री.गुप्ता म्हणाले, कारागृहातील बंदी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी पुढे येत आहेत. सुवर्णपदक प्राप्त बंदीवानांना शिक्षेत विशेष माफी देवून प्रोत्साहन देण्यात आले आहे. मागील वर्षी एक प्रयत्न म्हणून येरवडा कारागृहात बंदिवानांसाठी बुद्धिबळ खेळास सुरूवात केल्यानंतर एका वर्षातच आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. बंदिवानांनी चांगली तयारी करून मागच्या वर्षी सुवर्णपदक मिळविलेल. बाहेर सर्व सुविधा असणाऱ्या खेळाडूंना जे जमणार नाही ते या कारागृहातील बंदीवान खेळाडूंनी करून दाखविले. सध्या येरवडा कारागृहात महिला व पुरूष असे 200 बंदी बुद्धिबळ शिकत आहेत, असे त्यांनी सांगितले. यावेळी श्रीमती गोविल म्हणाल्या, बुद्धिबळामुळे बुद्धीला चांगली चालना मिळते व परिस्थितीला यशस्वीपणे सामोरे जाण्याचे कौशल्य निर्माण होते. त्यामुळे बंदिवानांना भविष्यात याचा लाभ होईल. विविध देशांतील कारागृहांतील बंदिवानांना बुद्धिबळ या खेळामध्ये प्रशिक्षण देवून विविध देशांतील तुरुंगातील बंदीवानांची स्पर्धा आयोजित करणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे. या माध्यमातून बंदीवानांमध्ये तुरूंगातून सुटका झाल्यानंतर समाजामध्ये गेल्यानंतर आपल्यातही काही कौशल्ये आहेत ज्याआधारे आपण समाजामध्ये आत्मसन्मानाने जगू शकू असा आत्मविश्वासही निर्माण होऊ शकणार आहे, अशी माहिती उद्घाटनप्रसंगी देण्यात आली.

# महायुतीमध्ये ज्या मतदारसंघात उमेदवारी मिळणार नाही तिथे कार्यकर्त्याला वाऱ्यावर सोडणार नाही : सुनिल तटकरे

## शिर्डी विधानसभा मतदारसंघाचा सुनिल तटकरे यांनी घेतला आढावा

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** आपल्याला महायुतीत सर्वच ठिकाणी उमेदवारी मिळेल असे नाही मात्र ज्याठिकाणी उमेदवारी मिळणार नाही तिथे माझ्या कार्यकर्त्याला वाऱ्यावर सोडणार नाही असा शब्द राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी शिर्डी येथे दिला.
आज राज्यव्यापी दौऱ्याचा दुसरा दिवस असून सकाळी साईबाबांचे दर्शन घेऊन शिर्डी विधानसभा मतदारसंघाचा आढावा सुनिल तटकरे यांनी घेतला. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत कार्यकर्ता जागरुक असला पाहिजे.आगामी विधानसभा निवडणुकीला महायुती म्हणून सामोरे जायचे आहे. त्यामुळे विरोधकांच्या अपप्रचाराला आपल्याला उत्तर देण्याचे काम करायचे आहे असेही सुनिल तटकरे यावेळी म्हणाले. अहमदनगर जिल्हा हा राष्ट्रवादी कॉंग्रेसचा बालेकिल्ला आहे. या जिल्हयाने अजितदादांना नेहमीच पाठबळ दिले आहे. हे भरभक्कम पाठबळ कायम




मिळण्यासाठी प्रयत्न करायचे आहे. लोकसभा निवडणूकीत आणि आताही अजितदादांना सर्वाधिक टार्गेट करण्यात येत आहे. हे आपला मित्रपक्ष करत नाहीय तर आपल्यावर सतत लक्ष ठेवून असलेले विरोधातील काहीजण ही बदनामीची मोहिम राबवत आहेत त्यांना सडेतोड उत्तर दयायचे आहे असे आवाहनही सुनिल तटकरे यांनी कार्यकर्त्यांना केले.

जनसामान्यांचे पाठबळ कसे मिळेल अशी भूमिका घेतली तर पक्षसंघटना अजून मजबूत होणार आहे.जनसामान्यांचे प्रश्न घेऊन तुम्हाला संघटनेने दिलेल्या पदाचा उपयोग कसा करता येईल यावर काम करा असा सल्लाही सुनिल तटकरे यांनी कार्यकर्त्यांना दिला.
या बैठकीत महिला प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी आपले विचार मांडले. शिर्डी विधानसभा मतदारसंघाची आढावा बैठक शिर्डी येथे आज पार पडली. या बैठकीला राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे, महिला प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र नागवडे, महिला जिल्हाध्यक्षा अनुराधा नागवडे, उत्तर शिर्डी जिल्हाध्यक्ष कपिल पवार, प्रदेश सचिव संग्राम कोतेपाटील, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, सामाजिक सेलचे प्रदेशाध्यक्ष सुनिल मगरे आदींसह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

# मराठा आरक्षणासाठी तरुणाची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी नगर रस्त्यावरील वाघोली भागातील एका कंपनीच्या आवारात सुरक्षारक्षक तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. तरुणाने आत्महत्या करण्यापूर्वी समाजमाध्यमात व्यक्त होऊन मराठा आरक्षणासाठी आत्महत्या करत असल्याचे सांगितले. मनोज जरांगे यांच्या नावाने त्याने चिठ्ठी लिहिली. आरक्षण मिळाले पाहिजे, असा मजकूर तरुणाने आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिट्ठीत होता. प्रसाद देठे (रा. वाघोली, मूळ रा. बार्शी) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. देठे मूळचे बार्शी तालुक्यातील रहिवासी आहेत. काही वर्षांपूर्वी ते कामानिमित्त पुण्यात स्थायिक झाले होते. वाघोली भागातील एका खासगी कंपनीत ते सुरक्षारक्षक होते. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुली, मुलगा असा परिवार आहे. मुलगा द्वितीय वर्षाला शिक्षण घेत आहे. दोन्ही मुली शिक्षण घेत आहे. मंगळवारी (१८ जून) ते कामावरून घरी आले. त्यानंतर देठे समाजमाध्यमात व्यक्त झाले. मराठा समाजातील तरुणांच्या व्यथा, बेरोजगारी, तसेच अन्य समस्यांविषयी त्यांनी समाजमाध्यमात व्यथा मांडली. त्यानंतर त्यांनी कंपनीच्या आवारातील टेम्पोच्या लोखंडी गजाला डोक्याला गुंडाळण्याचे कापड (गमछा) बांधून गळफास घेतला. आत्महत्या करण्यापूर्वी प्रसाद देठे यांनी चिठ्ठी लिहून ठेवली होती.

# कोल्हापुरातील महालक्ष्मी मंदिरात दागिन्यांची मोजदाद सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** करवीर निवासिनी महालक्ष्मी मंदिरातील देवस्थान समितीच्या दानपेट्यांमध्ये



भक्तांनी अर्पण केलेल्या दागिन्यांची मोजदाद मंदिर कार्यालयात मंगळवारपासून सुरू झाली आहे. २०२०-२१ ते २०२३-२४ या कालावधीत मंदीरात जमा असलेले दागिने यावेळी मोजले जात आहेत. गेल्या चार वर्षातील दानाची मोजदाद देवीच्या मंदिरातील देवस्थान कार्यालयात सुरू आहे. मंदिरात अर्पण होणारे दागदागिने सोन्या- चांदीचे अलंकार नोंद करून ते दरमहा पिशवीमध्ये ठेवले जाते. ठराविक कालानंतर देवस्थान समितीमार्फत या दागिन्यांची मोजणी केली जाते. तज्ञ मुल्यांकनकर्तामार्फत या दागिन्यांचे मुल्यांकनही चालू बाजारभावाप्रमाणे नोंदवले जाते.आज पहिल्याच दिवशी दागिने मोजणी करताना देवीला सोन्या-चांदीची नाणी, मूर्ती, सौभाग्यअलंकार, पैंजण, जोडवी अर्पण झाल्याचे निर्दशनास आले. पुढील काही दिवस ही मोजदाद सुरू राहणार असून अंतिम मोजणी झाल्यावर एकुण किती दान जमा झाले हे प्रसिद्ध केले जाणार आहे. ही मोजणी नाशिक येथील प्रसिद्ध मुल्यांकनकर्ता नितिन वडनेरे, शेखर वडनेरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. मंदीर व्यवस्थापक महादेव दिंडे, खजिनदार महेश खांडेकर, निवास चव्हाण, शितल इंगवले,विशाल आगरकर, महेश महामुनी, एकनाथ पारखी, देवस्थान कर्मचारी उपस्थित होते.

# राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीसपदी संदीप गवई

आधुनिक केसरी न्यूज

**ज़ैनुल आबेद्दीन**

**मेहकर :** बुलढाणा जिल्हयातील मेहकर येथील शाहू फुले आंबेडकर चळवळीत सक्रिय कार्यकर्ते तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीपभाऊ गवई यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदी निवड केल्याचे पत्र प्रदेश अध्यक्ष आदरणीय जयंत पाटील व प्रदेशअध्यक्ष पंडीत कांबळे साहेब यांच्या हस्ते राष्ट्रवादी भवन मुंबई येथे दि.18/06/2024 रोजी देण्यात आले. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष संजय गायकवाड प्रदेश उपाध्यक्ष लक्ष्मण सुरणर, लातुर जिल्हा अध्यक्ष लक्ष्मण कांबळे, धाराशिव जिल्हा अध्यक्ष राहुल बनसोडे, घनःश्याम शिंदे,समाज भुषण विवेक साळुंके, राजू कांबळे, नरसिंग गायकवाड, कुणाल माने,महिला आघाडी ललीताताई मगरे,रोहीणीताई चव्हाण,संघमित्रा एटम,प्रतिभा गवई आदी उपस्थित होते. या वेळी संदीप गवई यांनी सांगितले की मी बुलढाणा जिल्ह्यात व महाराष्ट्र राज्यात सामाजिक न्याय विभाग राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे मुळ बळकट करण्यासाठी अहोरात्र कष्ट करत राहील व आपले संपर्क कार्यकर्त्यांसोबत ठेवण्याचा प्रयत्न करीत राहिल. सर्व स्तरावरून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# खा. प्रतिभा धानोरकरांच्या आंदोलनात भावाचा प्रताप

## सख्ख्या भावाची अधिकाऱ्यांना शिवीगाळ : कार्यकर्त्याने अधिकाऱ्याच्या कानशिलात हाणली

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** भद्रावती तालुक्यातील बरांज येथे असलेल्या कर्नाटक एम्प्टा कोळसा खाणीच्या अनुषंगाने असलेल्या काही समस्यांबाबत आज काँग्रेस च्या नवनियुक्त खासदार प्रतिभा धानोरकर यांनी आंदोलन केले. या आंदोलनादरम्यान त्यांचे सख्खे भाऊ प्रवीण काकडे यांनी आपणच खासदार आहोत या अविर्भावात येत अधिकाऱ्यांशी बोलता बोलता शिवीगाळ सुरू केली . आणि काकडे यांचा पारा चढलेला पाहून त्यांच्या सोबत आलेल्या एका कार्यकर्त्याने त्या अधिकाऱ्याच्या थेट कानशिलातच हाणली. अनपेक्षित घडलेल्या या प्रकारामुळे संपूर्ण परिसरात एकूणच तणावाचे वातावरण निर्माण झाले. परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी पोलिसांनी सर्व अधिकाऱ्यांना घटनेच्या स्थळावरून दूर करण्याचा प्रयत्न केला. हा सर्व प्रकार थेट पोलिसांच्या समोरच झाल्यामुळे निवडून आल्या आल्या खासदारांच्या भावाची मुजोरी वाढली असे आता सगळीकडे बोलल्या जात आहे. त्यामुळेच या प्रकरणामध्ये खासदार प्रतिभा धानोरकर यांचे भाऊ प्रवीण काकडे यांच्यावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी करण्यात येत आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती तालुक्यात कर्नाटक एम्टा कोळसा खाण आहे. 2009 पासून सुरू झालेली ही खाण कर्नाटक सरकारच्या अधीपत्याखाली आहे. या खाणीतील कोळसा वाहतुकीमुळे परिसरातील शेतीतील पिकांना मोठा फटका बसू लागला आहे. याशिवाय ग्रामपंचायतीचे काही प्रश्न आहेत , प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न आहेत. कामगारांचेही काही प्रश्न आहेत . अशा या सर्व प्रश्नांना घेवून काँग्रेस च्या खासदार प्रतिभा धानोरकर व्यवस्थापनासोबत चर्चा करण्यासाठी बुधवार १९ जून रोजी खाण परिसरात गेल्या होत्या. यावेळी त्यांच्यासोबत त्यांचे सख्खे भाऊ प्रवीण काकडे आणि असंख्य कार्यकर्ते व प्रकल्पग्रस्त देखील या आंदोलनात सहभागी झाले होते. अधिकाऱ्यांशी चर्चा सुरू असतानाच खासदार धानोरकर यांच्याऐवजी त्यांचा भाऊ प्रवीण काकडे हा स्वतःच लोकप्रतिनिधी असल्याच्या अविर्भावात अधिकाऱ्याला दमदाटी देत विचारपूस करू लागला. विशेष म्हणजे अधिकाऱ्यांशी चर्चा करता-करता प्रवीण काकडे यांनी त्यांना आई बहिणीवरून शिवीगाळ केली आणि त्याचवेळी तिथे उपस्थित असलेल्या एका कार्यकर्त्याने त्या अधिकाऱ्याच्या थेट कानशिलात थापड मारली. यावेळी उपस्थित पोलिसांनी परिस्थिती आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याला फार यश आले नाही. अनपेक्षित पणे घडलेल्या या प्रकारामुळे एकच गोंधळ उडाल्याने व संतप्त जमाव अधिकाऱ्यांना मारहाण करतो की काय अशी स्थिती निर्माण झाल्याने पोलिसांच्या मदतीने अधिकाऱ्यांना कसेबसे बाहेर काढण्यात आले. कोणत्याही आंदोलनामध्ये अधिकाऱ्यांशी चर्चा करण्याची, त्यांच्यासमोर मागण्या ठेवण्याची एक पद्धत असते, शिष्टाचार असतो, पण धानोरकरांच्या या आंदोलनात तो पाळण्यात आला नाही. खुद्द खासदारांच्या सख्खा भावानेच शिवीगाळ करायला सुरुवात केल्याने निवडून आल्याआल्याच मुजोरी आल्याची चर्चा या परिसरात चांगलीच रंगू लागली आहे . दरम्यान, यासंदर्भात कर्नाटक एम्टा खाण व्यवस्थापनाचे उपाध्यक्ष जीभकाटे यांनी, यावर बोलण्यास नकार दिला. अशा घटनांमुळे कोळसा खाणीचे अधिकारी तथा कर्मचारी या भागात अशा दहशतीमुळे काम करायला तयार नाहीत. लोकप्रतिनिधींच्या नातेवाईकांची अशा प्रकारची दादागिरी व मुजोरी सुरू असल्याने या भागात काम करणारे अधिकारी देखील त्रस्त झाले आहेत. खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या या पहिल्याच आंदोलनात भावाच्या प्रतापामुळे चांगलीच चर्चा रंगायला लागली असून प्रवीण काकडे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी आता जोर धरत आहे. दरम्यान या घटनेचा व्हिडिओ आता समाज माध्यमातून सर्वत्र व्हायरल झाला असल्याने निवडून आल्या आल्याचं खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या प्रतिमेला चांगलाच धक्का पोहोचला आहे.



# हंसराज अहीर यांच्या प्रयत्नांना भरीव यश; वेकोलि प्रकल्पग्रस्तांना शैक्षणिक पात्रतेनुसार नोकरीचे नियुक्तीपत्र

## सास्ती विस्तारीकरण प्रकल्पातील नोकरी प्रस्ताव महिनाभरात स्वीकारणार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** वेकोलिच्या विविध क्षेत्राशी निगडीत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे अनेक प्रलंबित प्रश्न, समस्यांच्या निवारणार्थ सुनावणी, बैठक व बृहत पत्रव्यवहार व सतत पाठपुराव्याने अखेर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या अनेक ज्वलंत प्रश्नांची सोडवणूक करण्यात राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पुर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर याना यश मिळाले असून दि. 17 जून 2024 रोजी हंसराज अहीर यांच्या अध्यक्षतेत नागपुरातील वेकोलि विश्रामगृहात वेकोलिचे अध्यक्ष तथा प्रबंध निदेशक (सीएमडी) व अन्य वरिष्ठांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत विविध महत्वपुर्ण प्रलंबित समस्यांचे निराकरण झाल्याने प्रकल्पग्रस्तांच्या दृष्टीने ही बैठक फलदायी ठरली आहे.

सदर बैठकीस वेकोलि मुख्यमहाप्रबंधक (भूमि) व (औ.स.) मांजी आमदार सुदर्शन निमकर, विनोद शेरकी, अॅड. इंजी. प्रशांत घरोटे, धनंजय पिंपळशेंडे, मधुकर नरड, पवन एकरे, कोलगांवचे उपसरपंच पुरुषोत्तम लांडे, चुनाळाचे सरपंच बाळनाथ वडसकर, लक्ष्मण बोढे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

वेकोलि प्रबंधनाने सास्ती एक्सपॉन्शन प्रकल्पातील नोकरीचे प्रस्ताव या महिनाभरात स्वीकारण्यास अनुमती दिली. गोवरी पोवनी प्रकल्पातील आर्थिक मोबदला देयकास अंतिम मंजूरीही जून महिन्यातच देण्याचे मुख्यालयाने मान्य केले. गोवरी सेंट्रल प्रकल्प सेक्शन 4 करीता लवकरच प्रस्तावित करण्याचे तसेच भूमि अधिग्रहण प्रकल्पातील ग्रैंड डॉटर (नात) मुलीचा मुलगा/मुलगी व सुनेच्या नोकरीविषयी लवकरच निर्णय होवून अनुकंपा नोकरीत विवाहीत मुलीच्या तसेच मृतक नामनिर्देशीताचा भाऊ, बहीण यांना नोकरी देण्याविषयी मुख्यालयीन स्तरावर लवकरच सकारात्मक निर्णय होणार असल्याची माहिती सीएमडी यांनी हंसराज अहीर यांना या बैठकीत दिली.



न्यायालयीन प्रकरणातील प्रलंबित नोकऱ्या मार्गी लावण्यास गुणवत्ता प्राधान्य प्रकरणामध्ये निर्णय घेण्याबाबत ठोस धोरण स्वीकारले जाईल, भूमिगत खाणीतून सुरक्षा प्रहरीकरीता आवेदन केलेल्या कामगारांची कॅडर बदल विषयक सुची प्रकीयाधीन असून ती लवकरच जाहीर करण्यात येईल असेही बैठकीत आश्वस्त करण्यात आले. या व्यतिरिक्त पोवनी, सास्ती, सोनुर्ली गावातील उर्वरीत जमिनीचे अधिग्रहण, सीएमपीडीआयएल द्वारा सव्र्व्हेक्षण करुन तातडीने अंमल करण्याच्या सुचना एनसीबीसी अध्यक्षांनी केल्या. यावेळी भटाळी, पाटाळा व अन्य प्रकल्पातील एक सातबारा व 2 एकर पेक्षा अधिक तसेच दोन आराजी असल्यास फेरफार प्रक्रियेनंतर 2 नोकऱ्या देण्यास अडचण नसल्याचे ही प्रबंधनाने या बैठकीत स्पष्ट केले. तुकडेबंदी अवहेलना प्रकरणात प्रलंबित नोकरी प्रस्तावाबाबत जिल्हाधिकारी स्तरावर सकारात्मक निर्णय घेण्यात यावा अशा सुचना देण्यात आल्या. सदर बैठकीत या व्यतिरिक्त अनेक महत्वपुर्ण विषयांवर शिक्कामोर्तब झाल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये संतोष व्यक्त होत आहे.

# कृषी केंद्रात पेट्रोल टाकून लावली आग

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील उद्योग नगरी आणि व्यवसाय केंद्र असलेल्या खामगावमधील एका कृषी केंद्राला पेट्रोल टाकून आग लावून दिल्याची घटना घडली. हा अज्ञात आरोपी आणि आग लावण्याचा संपूर्ण घटनाक्रम परिसरातील सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे. या घटनेमुळे व्यावसायिकांसह खामगाव शहरात एकच खळबळ उडाली आहे.

यावर कळस म्हणजे हे कृषी केंद्र बियाणे, कीटकनाशके व खत विक्रेता संघटनेचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक संजय उर्फ मुन्ना पुरवार यांचे आहे. यामुळे ही 'आग' चांगलीच पेटण्याची चिन्हे आहे. मुन्ना पुरवार यांचे बाजारपेठ असलेल्या सरकी लाईन भागात ओम साई अँग्रो नावाने कृषी साहित्य विक्रीचे दुकान आहे. मंगळवारी ( दिनांक १८) मध्यरात्री नंतर दुकान परिसरात अज्ञात व्यक्ती आली. त्या बहाद्धराने त्याच्या जवळच्या कॅनमधील पेट्रोल 'शटर' खालून आणि समोरच्या भागात ओतले. यानंतर कॅन बाजूला ठेवून खिश्यातील माचीस काढून पेट्रोलवर भिरकावली. यामुळे क्षणार्धात आगीने भडका घेतला. पाहता पाहता ही आग चांगलीच पसरली. यामुळे दुकानातील सोयाबीन बियाण्यांच्या बॅग व कृषी साहित्य जळून हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे.

हा सारा थरारक घटनाक्रम सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे.दरम्यान नेमके याच वेळी आग लागलेल्या ओम साई ॲग्रो केंद्रासमोरून जाणाऱ्या एका दक्ष नागरिकामुळे संभाव्य भीषण अनर्थ टळला. या जागृत नागरिकाला दुकान पेटलेले दिसल्याने त्याने प्रसंगावधान दाखवत पुरवार यांना फोन करून आगीची माहिती दिली. यामुळे पूरवार कुटुंबीयांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन आग नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. आगीत दुकानातील सोयाबीनच्या काही बॅगा जळाल्या तसेच इतर कृषी साहित्य देखील जळून खाक झाले.

# मधुबन कट्ट्यावर कवितेच्या माध्यमातून बरसल्या पाऊस धारा

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** पावसाची आतुरता हा विषय घेऊन मधुबन कट्ट्यावर संपन्न झालेल्या १०४ व्या कविसंमेलनात जेष्ठ नागरिकांना काव्यरूपी पाऊसधारा अनुभवायला मिळाल्या.कोकण मराठी साहित्य परिषद शाखा उरण तर्फे विमला तलाव उरण शहर येथील मधुबन कट्ट्यावर माजी नगरसेवक माणिकराव पाटील यांचे अध्यक्षते खाली कवी संमेलन संपन्न झाले. या कविसंमेलनात कु.अनुज शिवकर, दौलत पाटील, हेमंत पाटील, संजय होळकर, मारूती तांबे,रामचंद्र म्हात्रे,अजय शिवकर,मच्छिंद्र म्हात्रे, प्रा.साहेबराव ओहळ, नरेश पाटील प्रा.एल.बी. पाटील आदी कवींनी आतुरता पावसाची या विषयावर आपल्या कविता सादर केल्या. कार्यक्रमाच्या उत्तर भागात सामाजिक, शैक्षणिक,सांस्कृतिक कार्यात योगदान देणा-या उरणातील प्रतिष्ठित नागरिकांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. ऑक्सिजन पार्क तयार करून पर्यावरण विषयी जनजागृती करणारे पर्यावरण मित्र सारडेचे नागेंद्र परशुराम म्हात्रे ,किर्तन व अध्यात्मिक सेवेतून प्रबोधन करणारे सोनारीचे नारायण तांडेल आणि मेल फिमेल व्हाईस सिंगर म्हणून रसिक वर्गाचे मनोरंजन करणारे चिरनेरचे मोहन फुंडेकर यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रमास रायगड भूषण प्रा.एल बी पाटील, मधुबन कट्ट्याचे अध्यक्ष श्रीरामचंद्र म्हात्रे, पत्रकार घनशाम कडू, पत्रकार विठ्ठल ममताबादे, राधाताई बीस्ट, अनिता शिवकर, नरेश पाटील,दत्ताराम नीलवर्ण, सुरेश भोईर, तानाजी गायकवाड, अनंत पाटील, भिकाजी गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षक मच्छिंद्र म्हात्रे यांनी केले तर आभारप्रदर्शनाचे काम जेष्ठ कवी हेमंत पाटील यांनी केले.



# राहुल गांधींच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप

## निमखेडी शिवारात सातपुड्याच्या पर्वत रांगेत राहुल गांधी यांचा दोन दिवस होता मुक्काम

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे मा. अध्यक्ष न्याययोध्या मा.खा.राहुल गांधी यांच्या वाढदिवसा निमित्त जळगांव (जा) मतदार संघातील आदीवासी ग्राम डुक्करदरी येथील मुलांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. मा.खा.राहुलजी गांधी यांची भारत जोडो यात्रा जेव्हा महाराष्ट्रातून मध्यप्रदेश कडे रवाना झाली तेव्हा जळगाव जा हे शेवटचे ठिकाण होते. याच डूक्करदरी आदिवासी गावानजीक निमखेडी शिवारात सातपुड्याच्या पर्वत रांगेत राहुलजी यांचा दोन दिवस मुक्काम होता. जळगाव नगरीत उस्फुर्त असा यशस्वी आदिवासी मेळावा सुद्धा पार पडला होता. त्या दिवसाची सुद्धा आज आठवण झाली. खा.राहुलजी गांधी यांचा वाढदिवस केक कापून व मिठाई वाटून साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित बांधवाना संविधानाचे महत्व समजावून उपस्थित विध्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्व पटवून देण्यात आले. याप्रसंगी सचिव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस तथा जळगांव (जा) मतदार संघाच्या पक्षनेत्या डॉ.सौ.स्वातीताई वाकेकर, माजी जि.प.अध्यक्ष प्रकाशभाऊ पाटील, तालुकाध्यक्ष अविनाश उमरकर, मा.नगरसेवक



श्रीकृष्ण केदार, अझहर देशमुख, जुनेद शेख, नासीर भाई, अनिल इंगळे, विठ्ठल डांगे, गजानन पुंडे, मनोहर मानकर, लोहार सिंग, फाट्यासिंग, रामसिंग भाई, ढगे सर, सुनिल निमकर्डे, नितीन जाधव आदी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी चिमुकल्यांना शालेय साहित्याचे वाटप करून मा.खा.राहुल गांधी यांच्या दीर्घायुष्य साठी प्रार्थना करण्यात आली.

# वृक्ष लागवडीसह छत्रपती अर्बनने घेतली संवर्धनाची हमी

## सभापती समाधान शिंगणे यांचा वृक्ष लागवडीचा निर्धार

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव मही :** बिघडत चाललेला पर्यावरणाचा समतोल अन् परिसरातील वाढते तापमान लक्षात घेता छत्रपती ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या वतीने संचालक व सभासदांच्या वाढदिवसानिमित्ताने वाढदिवस साजरा न करता वृक्ष लागवडीचा संकल्प केला. दरम्यान शेकडो वृक्ष लागवडीचा निर्धार करीत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा बाजार समितीचे सभापती समाधान शिंगणे यांनी वृक्ष लागवड सह संवर्धनाचा संकल्प व्यक्त केला. यावेळी बोलताना सभापती समाधान भिकाजी शिंगणे म्हणाले की, एक जुलै रोजी हरित क्रांती दिन व कृषी दिन वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्ताने आपले सामाजिक दायित्व म्हणून शेकडो वृक्ष लागवड व संवर्धनाची जबाबदारी ही छत्रपती अर्बनच्या वतीने घेतले असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. छत्रपती अर्बन पतसंस्थेचे संचालक ग्रा.प .सदस्य वसुदेव पाटील शिंगणे यांच्या वाढदिवसा निमित्त हिंदू स्मशानभूमीत वृक्ष लागवडीचे मोहीम राबविण्यात आली. याप्रसंगी ज्येष्ठ नेते राजेंद्र डूंगरवाल, खडकपूर्णा अर्बनचे अध्यक्ष संजय शिंगणे, राष्ट्रवादी ज्येष्ठ नेते एकनाथबाप्पू शिंगणे, प्रसिद्ध उद्योजक राजेंद्र आचलिया, माजी वैद्यकीय अधिकारी जे.पी.ताठे, माजी सरपंच सुभाष शिंगणे, रतन रेशवाल, सो.सा.उपाध्यक्ष सुभाष इंगळे, पुरुषोत्तम खंदारकर, प्रशांत पाटील, हभप सुनील महाराज शिंगणे, धर्मराज खिल्लारे, फरिद कुरेशी,संजय खरात, राम पऱ्हाड, अशोक पाबळे, अमोल बोबडे, रमेश शिंगणे, नितीन पडघान, सचिन आंधळे, व्यवस्थापक नितीन खिल्लारे, पुरुषोत्तम शिंगणे, संतोष चेके शिवप्रसाद पराड,रवींद्र पान्नासे, अमोल गुरव, रघु शिंगणे यांची वृक्ष लागवडी प्रसंगी उपस्थिती होती.





# लोणावळ्यात कायमस्वरुपी दिवसा जड वाहनांना बंदी

आधुनिक केसरी न्यूज

**लोणावळा :** लोणावळा शहरात होणारी कोंडी विचारात घेऊन जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरुन जाणारी जड वाहने पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. लोणावळा शहरात दिवसा जड वाहनांना कायमस्वरुपी बंदी घालण्याचे आदेश जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी दिले आहेत. लोणावळा, खंडाळा परिसरात वर्षाविहारासाठी मुंबई-पुण्यातील पर्यटक मोठ्या संख्येने येतात. शनिवार आणि रविवारी लोणावळ्यात पर्यटकांची गर्दी असते. लोणावळा शहरातून जाणाऱ्या मुंबई-पुणे महामार्गाचा वापर ट्रक, कंटेनर करतात. जड वाहतुकीमुळे वाहतुकीचा वेग संथ होऊन लोणावळा शहरात ठिकठिकाणी कोंडी होते. लोणावळा शहरातील वाहतूक समस्या सोडविण्यासाठी सकाळी सहा ते रात्री दहा यावेळीत सर्व प्रकारच्या जड वाहनांना कायमस्वरुपी बंदी घालण्याचे आदेश जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी दिले आहेत.
जड वाहनांमुळे लोणावळा शहरात गंभीर अपघात झाले आहेत. लोणावळ्यातील मनशक्ती केंद्र आणि खंडाळ्यातील बॅटरी हिल दरम्यान जड वाहनांना बंदी घालण्यात आली असून, मुंबई-पुणे महामार्गावरून जाणारी जड वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे.

# रिक्षाचालक हत्येप्रकरणी चार संशयित ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** मेरी ते रासबिहारी लिंक रोडवर रिक्षाचालकाच्या हत्येप्रकरणी चार संशयितांना स्थानिक गुन्हे शाखा विभाग दोनने ताब्यात घेतले असून त्यांना म्हसरूळ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. प्रशांत तोडकर (२८, रा. आदर्शनगर, रामवाडी) हा रिक्षाचालक होता. तो सीबीएस ते म्हसरूळ या मार्गावर रिक्षा चालवत होता. शनिवारी रात्री घराबाहेर पडलेला प्रशांत घरी परतलाच नाही. प्रशांतची हत्या करण्यात आल्याची माहिती रविवारी सकाळी पोलिसांकडून प्रशांतच्या कुटूंबियांना देण्यात आली. प्रशांतच्या घरी दोन भाऊ, बहीण, आई, वडील आहेत. स्थानिक गुन्हे शाखा विभाग दोनने मिळालेल्या माहितीनुसार पथक तयार करुन संशयितांच्या शोधासाठी पिंपरी चिंचवड येथे रवाना केले. निगडी येथील थरमॅक्स चौकात सापळा रचत विजय आहेर (३०, रा. रामवाडी), संकेत गोसावी (२६, रा. जुईनगर), प्रशांत हादगे (२९, रा. पेठरोड), कुणाल पन्हाळे (३०, रा. दिंडोरी रोड) यांना ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली असता विजय आहेर आणि तोडकर यांच्यात काही दिवसात भांडण झाले होते. या भांडणाचा हत्या करण्यात आल्याची कबुली संशयितांनी दिली.



# प्रा.डॉ. बाळासाहेब लबडे यांच्या गझलसंग्रहास कै.वसंत राशिनकर स्मृती पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज



**इंदौर :** शहरातील प्रतिष्ठित संस्था आपले वाचनालय या संस्थेचे संस्थापक सांस्कृतिक पुरुष वसंत गाशिनकर यांच्या स्मरणार्थ दरवर्षी कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. हा सोहळा आपले वाचनालय सभागृहात पार पडला. कार्यक्रमाचे पाहुणे, मराठी साहित्य अकादमीचे माजी संचालक अश्विन खरे आणि समाजसेविका व शिक्षणतज्ज्ञ विनीता धरम, अध्यक्ष अभ्यासक मधुसूदन तपस्वी वक्ता म्हणून सुभाष वाघमारे उपस्थित होते

आपले वाचनालय कक्ष आणि श्रीसर्वोत्तम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सत्कार समारंभात गुहागरचे प्रतिभावंत कवी व कादंबरीकार डॉ.बाळासाहेब लबडे यांना समारंभाचा सर्वोच्च सन्मान कविवर्ष वसंत राशिनकर स्मृती अ. भा. सन्मानाने सन्मानित करण्यात आले.रोख रक्कम सन्मानपत्र सन्मानचिन्ह पुष्पगुच्छ देऊन दिमाखदार सोहळ्यात त्यांना एक कैफियत या गझल संग्रहासाठी सन्मानित करण्यात आहे. क्षेत्री राशिनकर यांनी सूत्रसंचालन सुरळीत केले. संदीप राशीनकर यांचे आभार मानले. यावेळी प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जलवाहिनी फुटल्याने पाणी पुरवठा विस्कळीत

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** गंगापूरच्या बळवंतनगर भागात जलवाहिनी फुटल्याने सोमवारी शहराच्या अनेक भागातील पाणी पुरवठा विस्कळीत झाला. ज्या ठिकाणी ही जल वाहिनी फुटली, तिथेच १२०० मीटर व्यासाच्या दोन मुख्य जलवाहिन्या आहेत. प्रारंभी, नेमकी कुठली जलवाहिनी फुटली, याची स्पष्टता नसल्याने गोंधळ उडाला. सर्व वाहिन्यांचा पाणी पुरवठा थांबवून तपासणी केली गेली. त्यानंतर ५०० मीटर व्यासाची जलवाहिनी फुटल्याचे दिसले आणि पाणी पुरवठा विभागाचा जीव भांड्यात पडला. मुख्य जलवाहिनी फुटली असती तर, संपूर्ण शहराचा पाणी पुरवठा ठप्प झाला असता, असे या विभागाचे वरिष्ठ अधिकारी सांगतात. परंतु, फुटलेल्या जल वाहिनीची झळ अनेक भागांना बसली.

गंगापूर धरण तळ गाठण्याच्या मार्गावर असताना पाणी वितरण प्रणालीतील दोषामुळे वारंवार पाणी पुरवठ्यात अडथळे निर्माण होत असल्याचे चित्र आहे. चार ते पाच महिन्यांत महापालिकेने अनेकदा विशिष्ट काही भागातील किंवा संपूर्ण शहराचा पाणी पुरवठा एकेक दिवस बंद ठेऊन दुरुस्तीची कामे केली होती. परंतु, जल वाहिन्यांमधील दोष कमी होण्याऐवजी वाढत चालला आहे. नाशिक शहराला गंगापूर आणि मुकणे धरणातून पाणी पुरवठा होतो.

# नवीन शैक्षणिक धोरण बहुआयामी

## प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आपल्या आवडीचे विषय निवडून सर्वांना आपल्या मातृभाषेतून शिक्षण घेता येणार आहे. येणाऱ्या काळामध्ये सर्वांनी तंत्रज्ञान शिकणे महत्वाचे आहे कारण लागू होणारे लागू झालेले नवीन शैक्षणिक धोरण २०२० हे बहुआयामी आहे असे प्रतिपादन प्राचार्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विद्यापरिषद सदस्य, सिनेट सदस्य डॉ.नितीन घोरपडे यांनी शंकरराव भेलके महाविद्यालय, नसरापूर येथे आयोजित स्कुल कनेक्ट एनइपी कनेक्ट या कार्यशाळेमध्ये केले. पुढे त्यांनी नवीन शैक्षणिक धोरणातील शिक्षणाचे वेगवेगळे टप्पे यामध्ये प्राथमिक शिक्षण ते महाविद्यालयीन शिक्षण कशा प्रकारे असणार आहेत याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांचे संपूर्ण पदवीचे असणारे क्रेडिट अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट मध्ये साठविले जाऊन त्यामधून त्याची गुणवत्ता ठरविली आहे असे मत व्यक्त केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ( नियोजन व विकास विभाग) आणि पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शंकरराव भेलके महाविद्यालय, नसरापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ विद्यापीठ गीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्तविक व पाहुण्यांचा परिचय कार्यशाळा समन्वयक प्रा.भगवान गावित केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.संजीव लाटे, अमृतेश्वर महाविद्यालय, विंझर यांनी नवीन शैक्षणिक धोरण एक संधी आहे त्याचे सोने कसे करावयाचे हे आपण ठरविले पाहिजे असे मत व्यक्त केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य, प्रा.डॉ.धोंडीराम पवार, यांनी नवीन शैक्षणिक धोरण नेमके काय आहे हे अधोरेखित करून पदवी किती वर्षात मिळविता येणार, किती क्रेडिट मिळविले म्हणजे आपली पदवी पूर्ण होईल,अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट म्हणजे काय?, मल्टिपल एंट्री आणि मल्टिपल एक्सिट काय असणार आहे ते सविस्तरपणे विद्यार्थी , पालक व उपस्थित प्राध्यापकांपुढे मांडले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार शितोळे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये नवीन शैक्षणिक धोरण सर्वांसाठी तसेच विद्यार्थ्यांसाठी एक सुवर्ण संधी असून सर्वांनी स्वीकार करून त्याचा लाभ घेणे गरजेचं आहे. आमचे शंकरराव भेलके महाविद्यालय नवीन शैक्षणिक धोरणासाठी सज्ज असून महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरणासाठी डिजिटल रेकॉर्डिंग स्टुडिओ, अद्ययावत ग्रंथालय आणि वाचान कक्ष, नाविन्यपूर्ण अद्यावत संगणक लॅब, भाषा लॅब, खेळाचे अद्ययावत साहित्य, अद्यावत जिमखाना, खेळासाठी प्रशस्त असे क्रीडांगण अशा सुविधा महाविद्यालयात उपलब्ध आहेत त्याचा उपभोग भोर, वेल्हा तालुक्यातील सर्व १२ वी उत्तीर्ण विद्यार्थांनी घ्यावा असे मत व्यक्त केले. कार्यशाळेचे आयोजन ग्रंथपाल प्रा.भगवान गावित यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.तुषार शितोळे यांच्या मार्दर्शनाखाली केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.जगदीश शेवते यांनी तर आभार प्रा.प्रल्हाद ननावरे यांनी मानले. कार्यशाळेस महाविद्यालयातील प्रा.संगीता घोडके, डॉ.हिमालया सकट, प्रा.सहदेव रोडे, प्रा. पौर्णिमा कारळे, प्रा.जीवन गायकवाड, डॉ.सचिन घाडगे, प्रा.दयानंद जाधवर,प्रा.संदीप लांडगे, प्रा.वर्षा तनपुरे, प्रा. माउली कोंडे, प्रा.महेश कोळपे, प्रा.कोमल पोमण, प्रा.ऐश्वर्या धुमाळ,विकास ताकवले, आशिष परमार, महेश दळवी, सुमित कांबळे, अभिषेक मोरे, धनाजी माने, मनीषा मोहिते इ. सर्वांचे सहकार्य लाभले तसेच सर्व कार्यशाळेस विद्यार्थ्यांसह पालकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# सुजन फौंडेशनकडून खेळाडूंचा सत्कार

## नेपाळच्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**तरडगाव :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शैक्षणिक व सामाजिक विचार मंच यांच्या कडून चौधरवाडी ता.फलटण येथे विद्यार्थी घडविणारे शैक्षणिक कार्य केले जात आहे. नुकत्याच नाशिक येथे संपन्न झालेल्या क्रीडा स्पर्धेतून विचारमंचच्या शैक्षणिक संकुलात शिकणाऱ्या क्रांतिज्योती क्रिडा मंडळाच्या खेळाडूंनी चमकदार अशी कामगिरी केलेली असून नेपाळ येथे होत असलेल्या आंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धेसाठी याच विद्यार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. या निवडीबद्दल खेळाडूंचे अभिनंदन केले जात आहे. सुजन फौंडेशनकडून विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार कार्यक्रम घेण्यात आला होता.खेळाडूंना महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा भेट देत तसेच प्रत्येकाला ग्लास देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार विकास शिंदे, सुजन फौंडेशनचे अध्यक्ष अजित जाधव,सामाजिक कार्यकर्ते प्रशांत शिंदे,क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शैक्षणिक व सामाजिक विचार मंच चे अध्यक्ष तुकाराम कोकाटे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच उपाध्यक्ष सोमनाथ भोसले, सचिव नंदकुमार बनसोडे, मार्गदर्शक अविनाश साळवे, विचारमंचचे सदस्य गोरख शिंदे, संजय पवार, राजेंद्र धुमाळ, विनोद हिप्परकर, राजेंद्र हिप्परकर, दिलीप खराडे, अमित जाधव, विनोद भोसले, हणमंत गिरमे, बाळकृष्ण गिरमे, सतीश म्हेत्रे, ढोले दादा आदींची सुद्धा विशेष उपस्थिती होती. यावेळी विकास शिंदे, अजित जाधव, तुकाराम कोकाटे, अविनाश साळवे, नंदकुमार बनसोडे आदींनी मनोगते व्यक्त केली. तसेच कोमल खीलारे,शिवानी चौधरी या विद्यार्थीनींनी सन्मानाबद्दल मान्यवरांचे आभार व्यक्त केले.

नाशिक या ठिकाणी पार पडत असलेल्या राष्ट्रीय 6TH SDPF फेडरेशन इंडिया या स्पर्धा संपन्न करण्यात आल्या. यामध्ये चौधरवाडी येथील क्रांतिज्योती क्रिडा मंडळाने यशस्वी अशी वाटचाल केली. 800 मीटर धावणे (१७ वर्ष वयोगटातील) ओंकार मोहन कानडे (प्रथम क्रमांक) २ मिनिट ३४ सेकंद,रोहित विनोद हिप्परकर (दुसरा क्रमांक)२ मिनिट ४८ सेकंद,कोमल महेंद्र खिलारे (प्रथम क्रमांक)३ मिनिट १३ सेकंद,४०० मीटर धावणे (१७ वर्ष वयोगटातील),प्रतिज्ञा महेंद्र खिलारे (प्रथम क्रमांक)५६ सेकंद,४०० मीटर धावणे,१४ वर्ष वयोगटातील कुणाल नंदकुमार बनसोडे (प्रथम क्रमांक)१ मिनिट १६ सेकंद,सोहम राजेंद्र हिप्परकर (दुसरा क्रमांक) १ मिनिट २२ सेकंद,अमृता अंकुश डंबरे (प्रथम क्रमांक) १ मिनिट २० सेकंद,200 मीटर धावणे १४ वर्ष वयोगटातील धनश्री गजानन पवार (प्रथम क्रमांक) 35 सेकंद 96 मायक्रो सेकंद,ईश्वरी मनोज भोसले( दुसरा क्रमांक) ४७ सेकंद ६५ मायक्रो सेकंद,२०० मीटर धावणे (१७ वर्ष वयोगटातील) ऋषिराज दिलीप खराडे(प्रथम क्रमांक) २८ सेकंद १६ मायक्रो सेकंद,प्रतीक्षा अनिल मदने (प्रथम क्रमांक) ३३ सेकंद २० मायक्रो सेकंद,१०० मिटर धावणे सत्यजीत सागर मोरे (तिसरा क्रमांक)१८ सेकंद आदींनी यश मिळविलेले आहे.पुढील आंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धा ही नेपाळ या ठिकाणी होणार असून यासाठी विशेष मेहनत घेतली जात आहे.सर्व मान्यवरांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिलेल्या आहेत.

# कवठे येमाईत पुन्हा एकदा चोरी : सुमारे पावणे तीन लाख रुपयांचे साहित्य लंपास

आधुनिक केसरी न्यूज

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्याच्या पश्चिम भागातील अष्टविनायक महामार्गावरील कवठे येमाई त आज पहाटे दोनच्या दरम्यान महामार्गालगत असणारे श्री गणेशा ट्रेडर्स हे बिल्डिंग मटेरियल सप्लायरचे दुकान मुख्य दरवाजा व शटर उचकटून टाकत आतील पत्रे, जाळी इनव्हर्टर, बॅटरी, सीसीटीव्ही, रिसिव्हर तोडून व इतर साहित्य असा सुमारे पावणे तीन लाख रुपयांचा माल चोरून नेल्याची घटना घडली आहे. याबाबत दुकानाचे मालक बाळासाहेब गावडे, निखिल मिडगुले यांनी ही माहिती दिली. गावडे व मिडगुले यांनी दिलेल्या माहिती नुसार ते संध्याकाळी दुकान बंडकारून घरी गेले होते. सकाळी हार देणार्या व्यक्तीने चोरी झाल्याची माहिती त्यांना दिली. ते दोघेही तात्काळ दुकानाकडे आले. दुकानात व आतील बाजूस लावलेले सीसीटीव्हीची चोरटयांनी तोडफोड केली होती. दुकानाचे समोरील बाजूस असणाऱ्या दुसऱ्या दुकानाच्या सीसीटीव्हीत रात्री पावणेदोनच्या सुमारास एक पिकअप गाडी आतमध्ये दिसून आली. चोरट्यांनी चोरलेला सर्व माल या पिकामधूनच नेला असल्याचे गावडे यांनी सांगितले.गावडे यांनी दिलेल्या माहिती नुसार दुकानाचे सीसीटीव्ही,त्याचे मशीन,बॅटरीसह इनव्हर्टर,५० पत्रे,१० तारेचे जाळी बंडल,व इतर साहित्य मिळून सुमारे पावणे तीन तीन लाख रुपयांचे साहित्य चोरट्यांनी लांबवले आहे.या घटनेबाबत शिरूर पोलिसांना माहिती देण्यात असून कवठे येमाई परिसरात सातत्याने होत असलेल्या विविध प्रकारच्या चोरीच्या घटना रोखण्यात पोलिसांना अपयश येत असून पोलिसांच्या कार्यक्षमतेबद्दल नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या घटनेचा परिसरात घडलेल्या डीपी चोऱ्या व इतर घटनांचा तात्काळ छडा न लागल्यास या भागातले शेतकरी,व्यापारी,ग्रामस्थसांसह शिरूर पोलीस स्टेशनवर मोर्चा काढण्याचा इशारा कवठे येमाईचे माजी सरपंच बबनराव मारुती पोकळे यांनी दिला आहे.

तर रात्री कवठे येमाई येथे झालेल्या चोरीचा लवकरात लवकर तपास लावू व यातील आरोपी गजाआड करू असे आश्वासन शिरूरचे पोलीस निरीक्षक ज्योतीराम गुंजवटे यांनी दिले आहे.



# कवयित्री काळवीट यांच्या आशयगर्भ कवितांमधून उमटते संवेदनशील मनाचे प्रतिबिंब

## साहित्यिक हिंगोणेकर : जयश्री काळवीट यांच्या कवितेच्या गहिऱ्या डोही काव्यसंग्रहाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**भुसावळ :** आत्मशोधातून कवितेची रचना करत असताना कवी आपल्या संवेदनशील मनातून सभोवताले जगही टिपत असतो. जयश्री काळवीट यांची कविता आत्मशोध आणि सभोवतालचे अभिव्यक्ती मांडणारी आहे. त्यांच्या कवितेचे मुख्य सूत्र आशयगर्भ कविता असून कवितेच्या गहिऱ्या डोही या काव्यसंग्रहातून त्यांच्या संवेदनशील मनाचे प्रतिबिंब उमटले असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक शशिकांत हिंगोणेकर यांनी केले. भुसावळ येथील ब्राह्मण संघात आयोजित कवयित्री जयश्री काळवीट रचित कवितेच्या गहिऱ्या डोही या काव्यसंग्रह प्रकाशन सोहळ्याच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. समारंभाचे अध्यक्षस्थानी मूजे महाविद्यालयाच्या सेवानिवृत्त मराठी विभाग प्रमुख डॉ. चारूता गोखले तर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त उपप्राचार्य तथा ज्येष्ठ साहित्यिक प्रा.डॉ. वा. ना. आंधळे, मूजे कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा.सौ. संध्या महाजन, बालभारतीच्या मराठी भाषा अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. जगदीश पाटील यांच्यासह कवयित्री सौ. जयश्री काळवीट व मध्य रेल्वेतील लोको पायलट प्रसाद काळवीट




उपस्थित होते. प्रारंभी सरस्वती मातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. मान्यवरांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कवितेच्या गहिऱ्या डोही या काव्यसंग्रह लेखनामागची भूमिका कवयित्री जयश्री काळवीट यांनी प्रास्ताविकात मांडली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते काव्यसंग्रह प्रकाशन करण्यात आले. प्रा.डॉ. वा. ना. आंधळे यांनी आपल्या मनोगतातून कवयित्री जयश्री काळवीट यांच्या काव्यसंग्रहाचा सर्वांगसुंदर आढावा घेतला. काव्यसंग्रहातील कविता, त्यातील भाव, सौंदर्य, विचार तसेच प्रतिमा, प्रतीके, रूपके यांचा चपखलपणे केलेला वापर यासंदर्भात मुद्देसूद व सविस्तरित्या आणि कवितांची उदाहरणे देऊन काव्यसंग्रहाची वाङ्ममयीन मूल्ये कथन केले. तसेच त्यांच्या कविता आत्मशोधातून आत्मबोधाकडे जाणाऱ्या असल्याचेही त्यांनी सांगितले. डॉ. जगदीश पाटील म्हणाले की, कवितेच्या गहिऱ्या डोही हा काव्यसंग्रह आत्मशोध, आत्मचिंतन व आत्मनिवेदन या मार्गाने जाणारा असल्याचे सांगून सृजनशीलता व शिक्षकाकडे असलेली निरीक्षण दृष्टी यांचा पुरेपूर वापर करून कवितांची निर्मिती झाली आहे. कवयित्री जयश्री काळवीट यांच्या कविता म्हणजे त्यांच्या भावविश्वाचे अनुभव कथन असल्याचेही त्यांनी सांगितले. प्रा.सौ. संध्या महाजन म्हणाल्या की, जयश्री काळवीट यांच्या कवितांमध्ये स्त्रीचे दुःख आले असले तरी त्याचे रडगाणे त्यांनी गायलेले नाही. महिलांच्या आयुष्यात येणारे विविध प्रसंग व त्यावर करायची मात आणि त्यातून प्रतिभाशक्ती जोपासून केलेली काव्यनिर्मिती हेच कवीमनाचे उत्तम लक्षण असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय मनोगतात डॉ. चारूता गोखले यांनी कवयित्री जयश्री काळवीट यांच्या काव्यामधील विविध कंगोरे आणि सौंदर्य याविषयी सांगून त्यांच्या कविता अनुभवांच्या काठावर घासून निर्माण झाल्या आहेत. स्त्रीच्या जीवनात येणारे प्रसंग व घटना यांच्याकडे पाहण्याचे संवेदनशील मन कवयित्री जयश्री काळवीट यांच्याकडे असल्याचेही त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन कवयित्री संध्या भोळे यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरूवातीला निमंत्रितांचे कवी संमेलन पार पडले. त्यात आम्ही सिद्ध लेखिका गृपच्या कवयित्रींसह राज्यभरातील कवींचा समावेश होता. त्यानंतर कवयित्री जयश्री काळवीट यांच्या सांगवी खुर्द जि. प. शाळेत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचे देखील बालकवी संमेलन पार पडले. त्याच्या अध्यक्षस्थानी वैभव भंडारी हे होते. काव्यसंमेलनाचे सूत्रसंचालन आशा साळुंखे यांनी केले. काव्यसंमेलन व काव्यसंग्रह प्रकाशन सोहळ्याला रसिक श्रोत्यांची उपस्थिती होती.



## नील मेटल प्रॉडक्ट लि.(जे बी एम ग्रुप) तर्फे रक्तदान शिबिरात ३१० बॅगचे संकलन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** नील मेटल प्रॉडक्ट लि.(जे बी एम ग्रुप) तर्फे भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते, या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती प्रमोद सूर्से (जॉइंट डायरेक्टर-डायरेक्टर इंडस्ट्रिअल सेफ्टी आणि हेल्थ विभाग) बाबासाहेब वालतूरे (व्ही.पी मोटरसायकल डिव्हिजन बजाज ऑटो ली.), महेश भालेकर (डेप्युटी डायरेक्टर-डायरेक्टर इंडस्ट्रिअल सेफ्टी आणि हेल्थ विभाग), हे उद्घाटन प्रसंगी हजर होते. सर्व कर्मचारी व कामगार यांनी उस्फूर्त योगदान देऊन ३१० बॅगचे संकलन केले. या कार्यक्रमास नील मेटल तर्फे शैलेश परदेशी, मिलिंद माळी, धनंजय शहाणे, नितीन अमृतकर , संजय ढोकणे, प्रवीण निर्मळ,किरण तासकर, दीपक कवडे, ऋषिकेश रायपुरे, कृष्णा मोरे, रमेश गोरे, निलेश गोरे, किसन भोसले, दिग्विजय ढगळे, आकाश सातपुते व सर्व कॉन्ट्रॅक्ट सुपरवायझर, कामगार, कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## आठ कोटी खर्चूनही शहरात अंधारच.. आठ कोटींचे बल्ब गेले कुठे.. ?

### सिनेट सदस्य नवनाथ चव्हाण यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शहरातील मुख्य रस्त्यासह शहरातील महत्त्वपूर्ण



चौकात तसेच जुना लोहा शहरातील कलाल पेठ आणि इतर दलित वसाहतीत तब्बल आठ कोटी खर्च करून बसविण्यात आलेले बल्ब गेले कुठे.. ? दलीत वसाहतीतील बसविण्यात आलेले बल्ब गायब झाल्याने मागील अनेक कालावधीपासून शहरात अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी सदरील गंभीर बाबीकडे तत्काळ लक्ष घालून लोहा शहरातील बल्ब संदर्भात सखोल चौकशी करून दोषींवर कार्यवाही करावी आणि लोहा शहराला अंधारातून प्रकाशात आणावे अशी मागणी सिनेट सदस्य तथा पं. स. सदस्य नवनाथ (बापू) चव्हाण यांनी केली आहे. लवकरच जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेवून तक्रार दाखल करणार असल्याची माहिती चव्हाण यांनी दिली.

लोहा नगरपालिकेतील लोकप्रतिनिधी व पालिका प्रशासन यांच्यात साटेलोटे असल्याने मागील चार ते पाच वर्षात शहराचा विकास मोठ्या प्रमाणात खुंटला आहे. विकास कामाच्या नावाखाली पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाला हाताशी धरून विविध विकास कामात प्रचंड अनियमितता, टक्केवारी कारभार, कामाचा निकृष्ट दर्जा यामुळे शहराचा विकास खुंटला आहे. शहरातील मुख्य रस्त्यावरील हायमास सह पथदिवे बंदावस्थेत आहेत. सदर पथदिवे बसवावेत अशी मागणी शहर वाशियातून होत आहे. आजघडीला लोहा शहरातील पथदिवे हे शोभेचे बाहुले झाले असल्याचे दिसून येत आहे. अंधारामुळे शहर वाशियाना नाहक त्रास सोसावा लागत आहे. शासनाच्या योजनेतून राबविण्यात आलेल्या आठ कोटी निधी अंतर्गत दलित वस्तीतील बल्ब गेले कुठे..? याची सखोल चौकशी करून दोषी विरुद्ध कठोर कार्यवाही करावी व अंधारात चाचपडणाऱ्या शहर वाशियांना उजेडात आणावे अशी मागणी शिवसेनेचे युवा नेते तथा सिनेट सदस्य नवनाथ (बापू) चव्हाण यांनी केली आहे. लवकरच जिल्हाधिकारी यांची भेट घेवून सदरील प्रकरणी निवेदन देणार असल्याचे नवनाथ चव्हाण यांनी सांगितले.

## तरुणीच्या मृत्यूस कारणीभूत तरुणाविरूद्ध गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील शुलीभंजन येथील दत्त धाम मंदिर परिसरात (दि.१७) मित्रांसोबत मोबाईल वर रिल्स बनवताना कार रिव्हर्स जात डोंगर दरीत खाली कोसळून तरुणीच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्या प्रकरणी मंगळवारी (दि.१८ )तरुणा विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रिल्स प्रकरणी तरुणीचा भाऊ मनिष दिपक सरोसे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वरुन गुन्हा दाखल करण्यात आले आहे. दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की श्वेता सरोसे यांच्याकडे कुठलाही वाहन चालवण्याचा परवाना नसताना व वाहन चालवता येत नसताना सुरज संजय मुळे याने कार तिच्या हाती दिली. तिने कार रिव्हर्स घेत कार न थांबता कल्च ब्रेक वर पाय ऐवजी एक्सलेटरवर पाय पडून कार सरळ डोंगरातून खोल दरीत कोसळून कार चेंदामेंदा होत यातच श्वेताचा मृत्यू झाला व यास सुरज मुळेच जवाबदार असल्याचे फिर्यादी म्हटले आहे. फिर्यादवर घटनास्थळी पोलिसांनी पंचनामा करून मुळेविरूद्ध गुन्हा दाखल करुन अटक केली आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस तपास करत आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांकडून त्र्यंबकेश्वर देवस्थानला सूचना

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वर येथे भाविकांना होत असलेल्या त्रासाकडे माध्यमांनी लक्ष वेधल्यानंतर जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी त्र्यंबकेश्वर येथे भेट देत सोयी सुविधांची पाहणी केली. श्रावण महिन्यात भाविकांची संख्या वाढण्याची शक्यता असल्याने त्यांची दर्शनासाठी गैरसोय होऊ नये, यासाठी काही सूचना केल्या. नाशिक येथील अ‍ॅड. महेंद्र सूर्यवंशी यांच्या कुटूंबियांना रविवारी त्र्यंबकेश्वर देवस्थानच्या सुरक्षारक्षकांकडून मारहाण झाली. देवस्थानच्या वतीने हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप अ‍ॅड. सूर्यवंशी यांनी केला. देवस्थानच्या वतीने भाविकांच्या सुरक्षेसाठी नेमण्यात आलेले सुरक्षारक्षकच जर भाविकांना त्रास देत असतील आणि देवस्थान याविषयी केवळ बघ्याची भूमिका घेणार असेल तर दाद कोणाकडे मागायची, असा प्रश्न भाविकांकडून उपस्थित होत आहे. रविवारच्या प्रकरणानंतर सोमवारी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी आषाढी वारीसाठी त्र्यंबक येथील संत निवृत्तीनाथ मंदिर देवस्थानच्या वतीने करण्यात आलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला. सायंकाळी



उशिरा जिल्हाधिकारी शर्मा यांनी त्र्यंबक देवस्थानला भेट देत तेथील उपाययोजनांची माहिती घेतली. भाविकांची गर्दी होत असतांना दर्शनासाठी होणारा गोंधळ पाहता श्रावणात तर ही गर्दी मोठ्या प्रमाणावर असेल, अशावेळी कमी वेळात जास्तीजास्त भाविकांना कसे दर्शन घेता येईल, या अनुषंगाने काय नियोजन असेल, यासाठी देवस्थानला जिल्हाधिकाऱ्यांनी काही सूचना केल्या. याठिकाणी वाहनतळ परिसरात दलालांकडूनही भाविकांची दर्शनाच्या नावाखाली लूट होत असते. या पार्श्वभूमीवर शहरातील प्रवेशाच्या कमानीजवळ भाविकांसाठी आवश्यक सूचना करण्यात येतील, ठिकठिकाणी मार्गदर्शक सूचना फलकांच्या माध्यमातून लावण्यात येणार आहेत. देश,विदेशासह स्थानिक पातळीवर देवस्थान परिसरात देवदर्शनासाठी काही आगाऊ नोंदणी करता येईल का, भाविकांची गैरसोय न होता नाशिक शहराची चांगली प्रतिमा जनमानसात जावी यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. याशिवाय वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करण्यात आली. त्र्यंबकेश्वर देवस्थान परिसरात दर्शनाच्या नावाखाली विश्वस्त, सुरक्षारक्षकांकडून होणारी लूट, तेथील व्यावसायिकांची मनमानी याविषयी स्थानिक पातळीवर सातत्याने आवाज उठविला जातो. परंतु, दोन-तीन दिवस चर्चा झाल्यानंतर सर्व काही आलबेल असल्याचा दावा मंदिर व्यवस्थापनाकडून करण्यात येऊन विषयावर पडदा टाकला जातो. याआधीही भाविकांना मारहाण, शिवीगाळ झाली आहे. परंतु, देवस्थान याबाबत कठोर भूमिका घेत नसल्याची तक्रार स्थानिकांनी केली.

# केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचा सत्कार

## बुलढाणा लोकसभा मतदारसंघातून चुरशीच्या लढाईत विजयी झालेले एकमेव खासदार

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** बुलढाणा लोकसभा मतदारसंघातून चुरशीच्या लढाईत विदर्भातून शिंदे शिवसेनेचे एकमेव चौथ्यांदा खासदार म्हणून निवडून येऊन केंद्रीय आरोग्य कुटुंब कल्याण (स्वतंत्र प्रभार ) राज्यमंत्री पदी वर्णी लागलेले नामदार प्रतापराव जाधव यांचा लोणार येथील पूर्वीच्या काळात राजकारणात समाजकारणात धार्मिक क्षेत्रात अग्रेसर असलेले प्रतिष्ठित जेष्ठ नागरिक बाबुरावजी (आश्रुजी) मापारी यांच्या निवासस्थानी नुकताच पारिवारिक सत्कार करण्यात आला.



लोणार येथील ज्येष्ठ नागरिक आश्रुजी मापारी ज्यांना दोन-तीन जिल्ह्यात बाबुरावजी मापारी या नावाने राजकारणी, समाजकारणी, अध्यात्मिक क्षेत्रातील मंडळी ओळखतात. पूर्वीच्या काळी लोणार ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, विधानसभा, लोकसभा असेल कोणत्याही पक्षाची मंडळी लोणार ला आल्यानंतर बाबुरावजी मापारी यांचे आशीर्वाद घेतले नाही असे कधी झाले नाही. आता त्यांनी राजकारणातून अलिप्त होऊन पूर्ण वेळ अध्यात्माला दिला आहे. ज्यांचा परिवार आज धार्मिक , सामाजिक, राजकीय, व्यापार, शेती , शैक्षणिक क्षेत्रात जिल्हाभर ओळख निर्माण करून एकत्र कुटुंब पद्धतीचा अवलंब करणारा म्हणून ओळखला जातो. अजून या परिवारासोबत नातेसंबंध स्नेहाचे संबंध असल्याने नामदार प्रतापरावजी जाधव यांनी त्यांच्या घरी येऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. या ठिकाणी मापारी परिवाराकडून त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी बाबुरावजी मापारी, गीताबाई मापारी, शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव प्रकाशराव मापारी, शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार प्राप्त राजेश मापारी, शिवछत्र मित्र मंडळाचे अध्यक्ष नंदकिशोर मापारी, व्यापारी विनायक मापारी, बबनराव मामा जाधव, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव, मयुरीताई जाधव, शंतनू मापारी, विशाल मापारी, अजिंक्य मापारी, आदित्य मापारी, ओम मापारी व कुटुंबातील सर्व लहान-मोठे मंडळी हजर होते.

# भगवान राईतकर यांच्या काव्य नभातील 'बाप' पुस्तकाचे प्रकाशन

## पुस्तकाला तरुण वाचकांचा मिळतोय उस्फूर्त प्रतिसाद !

आधुनिक केसरी न्यूज

**मेहकर :** येथील पत्रकार, लेखक व समीक्षक भगवान राईतकर त्यांच्या काव्य नभातील 'बाप' या पुस्तकाचे मेहकर येथील २ रे साहित्य जगत मराठी साहित्य संमेलनात प्रकाशन सोहळा संपन्न झाला.

काव्य नभातील 'बाप' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याला संमेलनाध्यक्ष डॉ. एस. एम. कानडजे, उद्घाटक शिवाजी जवरे, कथाकथन सत्राचे अध्यक्ष प्रा. मधुकर वडोदे , कवी व समीक्षक किरण डोंगरदिवे यांची विशेष उपस्थिती होती. तसेच यांच्या हस्ते प्रकाशन झाले. भगवान राईतकर यांचे हे आठवे पुस्तक असून राईतकर यांना साहित्य, पत्रकारिता, संगीत आणि शैक्षणिक क्षेत्रातील विविध पुरस्कार मिळालेले आहेत. या पुस्तकाचे मुखपृष्ठ, ब्लर्ब आणि अर्पण पत्रिका ही वाचकांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे. काव्य नभातील 'बाप' हे पुस्तक समीक्षा ग्रंथ असून यामध्ये २३ कवीच्या कवितेवर भगवान राईतकर यांनी समीक्षा लेखन केले आहे. या समीक्षा ग्रंथाला सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस, पुणे यांची ब्लर्ब व प्रस्तावना लाभली आहे. कवी व लेखक किरण डोंगरदिवे यांचे दोन शब्द या समीक्षा ग्रंथास आहेत. पुस्तक प्रकाशन सोहळ्यात व्यासपीठावर काव्य नभातील 'बाप' या पुस्तकाचे लेखक भगवान राईतकर साहित्य जगत परिवारातील गीता राईतकर, माधुरी कुलकर्णी, पुष्पा पाटणकर, सुनिता इंगळे, प्रा.पुजा मुळे, जयश्री कवीमंडन व यजुर्व राईतकर यांची उपस्थिती होती.




# जमावाच्या हल्ल्यात दोन जण जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** शहरातील भद्रकाली परिसरात अवैधरित्या गोवंश जनावरांची मांस विक्री सुरु असताना ती थांबविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर हल्ला करण्यात आला. या प्रकरणात दोन जण जखमी असून संशयितांविरुद्ध भद्रकाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सायंकाळी उशिरापर्यंत सुरु होते. या प्रकारानंतर बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी जखमी दाखल असलेल्या जिल्हा रुग्णालयात मोठ्या प्रमाणावर गर्दी केली. भद्रकालीतील महापालिकेच्या डॉ. जाकिर हुसेन रुग्णालयाच्या मागील बाजूला गोवंश जनावरांचे मांस विकले जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर भद्रकाली पोलीस संबंधित ठिकाणी छापा टाकण्यासाठी पोहचले. श्रीकांत क्षत्रिय (३८, रा. उत्तमनगर), नीलेश गांगुर्डे (२३, रा. पाटीलनगर) या कार्यकर्त्यांनी मांसविक्रीचा प्रकार थांबविण्याचा प्रयत्न केला असता संतप्त जमावाने त्यांच्यावर हल्ला केला. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर जिल्हा रुग्णालयात बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी गर्दी केली. बकरी ईद सण मुस्लीम बांधवांनी उत्साहात साजरा करावा, गोवंशचा वापर करु नये, अशा पध्दतीने हल्ला होत असेल तर बजरंग दल, हिंदू संघटना आक्रमक होतील, असा इशारा कार्यकर्त्यांनी दिला.



# खासदार डॉ. कल्याण काळे यांचा फुलंब्रीत जाहीर सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** जालना लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे नव निर्वाचित खासदार म्हणून डॉ. कल्याण काळे यांची बहुमतेने निवड झाल्यानंतर प्रथमच जाहिर सत्कार आयोजित करण्यात आला होता. सत्काराला उत्तर देतांना त्यानी आभार व्यक्त करतांना भोकरदन विधान सभेचे विशेष आभार मानतो. कारण ते त्यांचे घर होते फुलंब्री तर माझे घरच असल्याने मला शाश्वती होती, असे मत खा. डॉ. कल्याण काळे यांनी सत्काराला उत्तर देतांना व्यक्त केले जालना लोकसभा मतदार संघाचे विजयी खासदार डॉ. कल्याण काळे यांचे फुलंब्री शहरात जगी स्वागत करण्यात आले. याप्रसंगी भव्य रॅली काढण्यात आली होती. भव्य नागरी सत्कार यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती सभागृहात संपन्न झाला. या वेळी नामदेव पवार, विलास औताडे, राजेंद्र पाथरीकर, संदीप बोरसे, काशिनाथ जाधव वरूण पाथरीकर राजेंद्र ठोंबरे अजगर पटेल मंगला कापरे, लहुजी शेवाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. जालना लोकसभेच्या खासदार पदी डॉ. कल्याण काळे बहुमताने निवडून आल्याबद्दल तालुक्याच्या वतीने सोमवार (१७ जुन) रोजी फुलंब्री येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात भव्य सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. सत्काराच्या निमित्ताने येथील महात्मा फुले चौक ते मार्केट कमिटी पर्यंत भव्य रॅली काढण्यात आली होती या रॅली दरम्यान महाविकास आघाडीच्या वतीने डिजेच्या तालावर नाचून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

# बासर येथे समर्थ सेवामार्गाचा सरस्वती पूजन सोहळा

## पन्नास हजार विद्यार्थी, पालक सहभागी

आधुनिक केसरी न्यूज

**बासर :** दिंडोरीप्रणित अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे प्रमुख परमपूज्य गुरुमाऊली आण्णासाहेब मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक 16 व 17 जून 2024 रोजी श्री क्षेत्र बासर, तेलंगणा येथे सरस्वती माता सामूहिक पूजन व विद्यारंभ सोहळा उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यात देशभरातून आलेल्या पन्नास हजार विद्यार्थी व पालकांनी सहभाग नोंदवला. या भव्य सोहळ्याच्या पहिल्या दिवशी आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये विद्येची व बुद्धीची देवता असलेल्या सरस्वती मातेचे पूजन करण्यात आले. श्री क्षेत्र बासर हे पाल्यांच्या अक्षर अभ्यासासाठी म्हणजेच शैक्षणिक आरंभासाठी सुप्रसिद्ध आहे म्हणूनच मूल्यसंस्कार विभागाच्यावतीने पालक व पाल्यासाठी या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मुलांमध्ये भक्ती व मूल्यसंस्काराची शिकवण रुजवण्याचा विधायक हेतू या उपक्रमातून साध्य करण्यात आला. परमपूज्य गुरुमाऊली नी 18 विभागावर सविस्तर उपस्थित सेवेकर्यांना समुपदेश दिला.या सोहळ्याच्या निमित्ताने संपूर्ण राज्यातून आलेल्या हजारो मुले, युवा-युवती आणि पालकांनी सामुहिक पद्धतीने सरस्वती मातेचे पूजन केले. गुरुपुत्र आदरणीय श्री नितीन मोरे यांनीही सोहळ्यास उपस्थित सेवेकरी पालक-पाल्यांशी प्रबोधनात्मक संवाद साधला तर दिनांक 17 जून रोजी गुरुमाऊली यांनी उपस्थित सेवेकरी परिवारास अनमोल मार्गदर्शन केले. ते म्हणाले आजच्या या बालपिढीच्या खांद्यावर उद्याचा समर्थ भारत उभा राहणार आहे. ही भावी पिढी निर्व्यसनी, सुसंस्कृत, शारीरिक व मानसिक दृष्टीने कणखर, माता, पित्यासह, थोरा मोठ्यांचा आदर करणारी आणि महत्वाचे म्हणजे प्रखर राष्ट्रप्रेमी तयार होण्यासाठी सेवामार्ग सातत्याने प्रयत्न करीत असून या प्रयत्नाचा एक भाग म्हणून हा सोहळा आयोजीत करण्यात आला आहे. या प्रयत्नातून उद्या या बालकांनमधून आदर्श राज्यकर्ते, उच्च पदस्थ अधिकारी तयार होतील आणि "समर्थ भारतमाता " स्वप्न साकार करतील. या सोहळ्याला श्रीक्षेत्र बासर श्री सरस्वती देवस्थान संस्थानचे चेअरमन मा. श्री.शरद जी पाठक, श्री. श्री. श्री.बालयोगी रामलू जी महाराज, नंदीपेठ तेलंगणा राज्य राज्यसभेचे विद्यमान खासदार तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री परिवारासह अशोकराव चव्हाण, नांदेड लोकसभेचे विद्यमान खासदार वसंतराव चव्हाण यांचे सुपुत्र बंडू पाटील चव्हाण, नांदेड जिल्ह्याचे युवा उद्योजक तथा धर्माबाद केंद्रातील सेवेकरी सुबोध जी काकाणी मा. श्री. रामराव पवार पाटील आमदार मुधोळ/भैसा विश्वनाथ पाटील बिदराळी कर सभापती पंचायत समिती बासर, डी .लक्ष्मण राव सरपंच बासर, शेखर जी,आणी नर्सिंगराव तेलंगणा यांची प्रमुख उपस्थिती होती.






# कुटेंना पाच दिवसांची कोठडी पण स्पेशल लॉकअप

## सीसीटीव्हीसह इतरही सुविधा !

आधुनिक केसरी न्यूज

**फंड परदेशातून येणार असल्याने विलंब लागत आहे :** कुटे ग्रुपला परदेशातून येणाऱ्या फंडबद्दल माहिती दिली आहे. हा फंड लवकरच खात्यात जमा होणार आहे, मात्र परदेशीतील कंपनीचा फंड भारतात येत असल्याने येथील कारवाईसाठी विलंब लागत आहे. त्यामुळे कुटेंना काही सुविधांची मागणी केली होती, त्या देण्यासाठी न्यायालयाने परवानगी दिली आहे. त्यांना घरचे जेवण देण्याची मागणी केली होती, मात्र न्यायालयाने त्यास नकार दिल्याचे कुटेंचे वकील मुदिद जैन यांनी सांगितले.

**बीड :** ७ जून रोजी सुरेश कुटे, अशिष पाटोदेकर यांना पुण्यातून अटक केली. त्यांना माजलगाव न्यायालयाने सात दिवसांची कोठडी सुनावली, मात्र कुटेंच्या वकीलांनी बेकायदेशीर अटकेवर दोन दिवस युक्तीवाद केला. त्यानंतर १४ जून रोजी कुटेंना बीड शहरच्या गुन्ह्यात न्यायालयात हजर केले. पुन्हा अटक बेकायदेशीर ठरवत कुटेंना होम अरेस्टचे न्यायालयाने आदेश दिले. गेली अकरा दिवस कुटेंच्या वकीलांनी प्रभावी युक्तीवाद करत एकही दिवस त्यांच्यावर दाखल असलेल्या गुन्ह्याबद्दल बोलण्यास किंवा पोलीसांना तपास करण्यास संधी दिली नाही. सोमवारी शिवाजीनगरच्या गुन्ह्यात कुटेंना न्यायालयात हजर केले असता त्यांना पाच दिवसांची (२१ जूनपर्यंत) पोलीस कोठडी सुनावली. मात्र त्यांना स्पेशल लॉकअप, तिथे सीसीटीव्ही, त्यांच्या वकीलांना भेटण्याची परवानगी, झोपण्यासाठी कॉट, पंखा आदी सुविधा दिल्या आहेत. सुविधा का देईनात पण आजपासून प्रत्यक्षात गुन्ह्याच्या तपासाला सुरुवात झाली असून तपास अधिकारी कसा तपास करतात याकडे सर्व ठेवीदारांचे लक्ष लागले आहे.

ज्ञानराधा मल्टीस्टेट क्रेडिट को ऑपरेटिव्ह सोसायटीच्या राज्यभरात ५० शाखा असून असून सहा लाख ठेवीदारांचे दोन हजार कोटी रुपयांवरून अधिक ठेवी आहेत. मागच्या आठ महिन्यांपासून ज्ञानराधाचे आर्थिक व्यवहार ठप्प आहेत. ठेवीदारांच्या ठेवी वेळेत परत न दिल्यामुळे अध्यक्ष सुरेश कुटे, संचालक अशिष पाटोदेकरांसह इतरांवर माजलगाव, बीडसह इतर ठिकाणी आतापर्यंत १५ गुन्हे नोंद झाले आहेत. यातील काही गुन्हे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आले. दरम्यान, ७ जून रोजी सुरेश कुटे, अर्चना कुटे व आशिष पाटोदेकर यांना पुण्यातून ताब्यात घेतले. त्यानंतर सुरेश कुटे व आशिष पाटोदकर या दोघांना माजलगाव ठाण्यात दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली. सुरुवातीला माजलगाव व नंतर बीड शहर पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यांतील या दोघांची अटक बेकायदा असल्याचा कुटेच्या वकिलांचा दावा न्यायालयाने मान्य करत जामीन दिला होता. रविवारी (दि. १६) दोघांना न्यायालयासमोर हजर करण्यात आले. यावेळीही कुटेच्या वकिलांनी न्यायालयाचे ट्रान्सफर वॉरंट नसल्याने ही अटक बेकायदा असल्याचा मुद्दा मांडला. न्यायालयाने हा मुद्दा मान्य करत त्यांना सोडले. मात्र, पोलिसांनी शिवाजी नगर पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात पुन्हा दोघांना अटक केली. पोलिसांनी न्यायालयाची. परवानगी घेत सुरेश कुटे व आशिष पाटोदकरला अटक केली होती. सोमवारी दोघांना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.



# बीज प्रक्रिया करून शेतकऱ्यांना योग्य माहिती देऊन प्रत्यक्षिक सादरीकरण

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** समर्थ कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सिंनगाव जहांगीर येथे श्री गणेश शिवहरी बंगाळे यांच्या शेतात बीज प्रक्रिया करून त्याची शेतकऱ्यांना योग्य ती माहिती देऊन प्रत्यक्षीक सादरीकरण करून दाखवले.

यावेळी समर्थ कृषी महाविद्यालयातील कृषी शास्त्र विभागाचे प्रमुख अरविंद देशमाने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गावातील प्रत्येक शेतकऱ्याने योग्य बी प्रक्रिया करूनच पेरणी करावी असे मार्गदर्शन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन मेहत्रे व कार्यक्रम समन्वयक प्रा.मोहितजीत सिंह राजपूत यांचेही मार्गदर्शन शेतकऱ्यांना लाभले. यावेळी विद्यार्थी कृष्णा कापसे, विजय कष्टी, अजिंक्य कोल्हे, विवेक लहाने, आदित्य मानटे, प्रशांत कुमरे, कुणाल मस्के, अस्तित पवार, अभिजीत पिंपळे, गजानन पिसे, अभिषेक राऊत, सोमेश राजपूत, सौरभ साबळे रोहित सदाशिव, संकेत खोके यांनी उपक्रमात सहभाग घेतला. यावेळी तिथे गणेश बंगाळे आणि शिवहरी बंगाळे उपस्थित होते.



# तालुक्यात ठिकठिकाणी आ. सतिष चव्हाण यांच्याकडून भजन-कीर्तन साहित्याचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात ठिकठिकाणी गावात पदवीधर आमदार सतीशभाऊ चव्हाण यांच्या स्वनिधीतून भजन कीर्तन मंडळांना विविध भजन साहित्याची वाटप करण्यात आल्याने भाविक भक्तांतून आनंद समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

तालुक्यातील बाजार सावंगी, झरी, गल्लेबोरगाव, खुलताबाद शहर, सोबलगाव सह अनेक गावा गावातील भजन कीर्तन मंडळांना विना वाद्यपेटी तबला मुर्दुंग टाळ आदि भजन कीर्तन करण्याचें साहित्य वाटप करण्यात आले तर तालुकाभर या साहित्यांची वाटप करण्यात येत आहे. भजन कीर्तन मंडळांना नवीन साहित्य प्राप्त झाल्यानें भाविक भक्त मंडळ नागरिकांतून आनंद समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

सावंगी येथे साहित्याच वाटप करताना प्रकाश आबा, अनिल पाटील, जाधव, भिमराव नलावडे, अक्षय नलावडे, कांताराम आघाडे, भगवान कामठे,संजय काळे, सुदाम नाना, नारायण नलावडे, दगु सोनवणे, अजिनाथ नलावडे, राजू अप्पासह भजन कीर्तन मंडळ नागरिक उपस्थित होते.

# पावसाने हुलकावणी दिल्याने शेतकरी चिंतेत

आधुनिक केसरी न्यूज

**सावळीविहीर :** राहाता तालुक्यातील सावळीविहीर बुद्रुक परिसरातील शेतकर्यांची पावसाअभावी शेतीची पेरण्या खोळंबल्या असुन शेकरी चिंतेत असल्याचे चित्र सावळीविहीर सह परिसरातील निमगाव,निघोज,रुई आदी गावांमध्ये पहावयास मिळत आहे.गेल्या आठवड्यात राज्यात अनेक ठिकाणी पावसाने हजेरी लावली. यंदा मान्सुन वेळेवर दाखल झाल्याने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण पहावयास मिळाले होते. काही भागात पेरण्या पावसावर अवलंबुन असल्यामुळे पेरण्या खोळंबुन असुन काही भागात पेरणी केलेल्या शेताला पावसाच्या पाण्याची आवश्यकता आहे.

# परळी येथे 21 जून रोजी छत्रपती शाहु महाराज युवा शक्ती करिअर मेळावा

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य एस.एस.लोखंडे

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** जिल्ह्यातील दहावी-बारावी परिक्षेत पास झालेल्या विद्यार्थ्यांसाठी भविष्यातील रोजागराच्या संधी काय? आणि व्यक्तीमत्व विकास यावर सखोल मार्गदर्शन करण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था परळी यांच्यावतीने 21 जून रोजी छत्रपती शाहु महाराज युवा शक्ती करिअर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती प्राचार्य एस.एस.लोखंडे यांनी दिली. बीड जिल्ह्यात नुकत्याच दहावी आणि बारावी परिक्षेचा निकाल लागला. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना आता भविष्यात काय करायचे? असा प्रश्न निर्माण होतो. रोजगाराच्या संधी आणि व्यक्तीमत्व विकास कसा करायचा? याबाबत मार्गदर्शन मिळावे अशी अपेक्षा असते. यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था परळी या संस्थेने छत्रपती शाहु महाराज युवा शक्ती करिअर मेळावा आयोजित केला आहे. 21 जून रोजी सकाळी 11 वाजता तिरूपती मंगल कार्यालय, शिवाजीनगर येथे हा मेळावा होणार आहे. या मेळाव्यात व्यक्तीमत्व विकास बायोडाटा तयार करणे, मुलाखतीची तयारी, नवीन तंत्रज्ञानावर आधारीत प्रशिक्षण, रोजगाराची संधी याबाबत विविध क्षेत्रातील तज्ञ, प्रोफेसर, टिचर, सामाजिक संस्थांचे प्रमुख, उद्योजक आदि मार्गदर्शन करणार आहेत. या मेळाव्याला विद्यार्थी पालकांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्राचार्य एस.एस.लोखंडे यांनी केले आहे.

# आवकच घटल्यामुळे भाजीपाला कडाडला

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** मुंबईची परसबाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाशिक जिल्ह्यात दुष्काळी स्थितीमुळे भाजीपाला उत्पादनात कमालीची घट झाली असून त्याचा परिणाम मुंबईसह इतरत्र पुरवठ्यावर होत आहे. त्यातच आता पावसामुळे नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीत भाजीपाल्याची आवक ४० ते ५० टक्क्यांनी कमी झाली असून दरही कडाडले आहेत. परिणामी, भाजीपाला खरेदीत गृहिणींना हात आखडता घ्यावा लागत आहे. दुष्काळी स्थितीमुळे या वर्षी ही स्थिती उद्भवली. जिल्ह्यातील बहुतांश भागात पिण्याच्या पाण्यासाठी लाखो जणांना टँकरवर अवलंबून रहावे लागले. शेतीसाठी फारसे पाणी उपलब्ध नव्हते. ज्यांच्याकडे ते होते, त्यांना तीव्र उन्हात भाजीपाला उत्पादन जिकिरीचे ठरले. या सर्वांची परिणती पावसाळ्याच्या प्रारंभी भाजीपाला उत्पादनात लक्षणीय घट होण्यात झाली आहे. जिल्ह्यात नाशिक कृषी उत्पन्न बाजार समिती ही भाजीपाल्याचे व्यवहार होणारी मुख्य घाऊक बाजारपेठ आहे. येथून मुंबईला दैनंदिन दीडशे ते दोनशे वाहने भाजीपाला पुरवठा करतात. मुंबईला एरवी पाठविल्या जाणाऱ्या भाजीपाल्यात घट झाल्याचे साईधन व्हेजिटेबलचे संचालक मोहन हिरे यांनी सांगितले.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# कोकणातील पदवीधरांना पैशाच्या जोरावर विकत घेऊ पाहणाऱ्यांना त्यांची जागा दाखवा

## नाना पटोले : छत्रपतींच्या जिल्ह्यातून मविआच्या रमेश कीर यांना सर्वात जास्त मताधिक्य द्या

आधुनिक केसरी न्यूज



**पनवेल :** भारतीय जनता पक्षाच्या सरकारने महाराष्ट्रातील लोकशाही व्यवस्थेला, छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराला बरबाद करण्याचे पाप केले आहे. सत्तेच्या व पैशाच्या जोरावर कोणालाही विकत घेऊ अशी प्रवृत्ती राज्यात बळवली आहे. कोकण पदवीधर मतदारसंघाच्या या निवडणुकीत कोकणातील मतदारांना विकत घेऊ पाहणाऱ्यांना त्यांची जागा दाखवा असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केले आहे. कोकण पदवीधर मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार रमेश कीर यांच्या प्रचारासाठी पनवेलमध्ये आयोजित करण्यात मेळाव्यात नाना पटोले बोलत होते. ते पुढे म्हणाले की, भाजपाच्या राजवटीत महाराष्ट्र हे बेरोजगारांचे राज्य झाले आहे. १७ हजार पोलीस पदांसाठी १७ लाख अर्ज आले हे भिषण बेरोजगारीचे चित्र आहे पण ही पोलीस भरती तरी सुरुळीत पार पडेल काय याची शंका वाटते. कारण भाजपा सरकारमध्ये अशा भरती राबवल्या जातात व नंतर पेपरफुटी होते व परिक्षा रद्द होते. राज्यातील उद्योग मोठ्या प्रमाणात बाहेर गेले आहेत, महाराष्ट्राचे सर्व नियोजनच गायब झाले आहे. भाजपा सरकारने १० वर्षात १० पिढ्या बरबाद केल्या आहेत, वयोमर्यादा संपली की संधी जाते, ग्रामीण भागात तर परिस्थिती अत्यंत भयानक आहे. महाराष्ट्राची वाताहत करण्याऱ्या व्यवस्थेला धडा शिकवण्याची संधी तुमच्या हातात आहेत. नागपूर व अमरावती विधान परिषद निवडणुकीत भाजपाचा पराभव करुन इतिहास निर्माण केला ते काम पदवीधरांनीच केले असेच काम आता कोकण पदवीधरच्या निवडणुकीत करा असेही नाना पटोले म्हणाले. या मेळाव्याला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, शेकापचे आमदार जयंत पाटील, शिवसेनेचे उपनेते विजय कदम, माजी आमदार बळीराम पाटील, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस राजेश शर्मा, अभय छाजेड यांच्यासह महाविकास आघाडीचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते व पदवीधर मोठ्या संख्याने उपस्थित होते.



## विद्यार्थी हाच शिक्षणाचा केंद्रबिंदु मानून त्याचा विकास झाला पाहिजे : सुनील पुजारी

आधुनिक केसरी न्यूज

**नळदुर्ग :** ज्ञानदीप कलोपासक मंडळ संचलित दरिद्री विद्यालय आलियाबाद येथे शाळेच्या पहिल्याच दिवशी ८० टक्के उपस्थिती धरित्री च्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्य देऊन स्वागत ग्राम प्रवेश फेरीतील शैक्षणिक घोषवाक्य आणि आलियाबाद नगरी दुमदुमली. निसर्गाने जसे तुमचे पावसाच्या रूपाने स्वागत केले. तसे आम्ही तुमचे पुष्प, पाठ्यपुस्तक, देऊन स्वागत करीत आहोत या शैक्षणिक साहित्याचा जास्तीत जास्त वापर करून आपल्या गुणवत्तेत वाढ करण्याचा प्रयत्न करा आज जिकडे तिकडे मुलीचा धबधबा निकालात दिसत आहे त्यासाठी मुलांनी सुद्धा अभ्यासात स्वतःला गुंतून घ्यावे. शाळेला नेहमीच उपस्थित राहावे अभ्यास करावा, शाळेतील जास्तीच्या अनुपस्थितीमुळे विद्यार्थ्यांचे प्रगती होत नसते म्हणून आजचे शिक्षण हे विद्यार्थी केंद्र शिक्षण असून विद्यार्थी हाच शिक्षणाचा केंद्रबिंदू मानून त्यांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार उपक्रम राबवले जातात दहावी परीक्षेत विद्यालयाने उज्वल या संपादन केले आहे. शाळेचे वातावरण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास पोषक आहे. असे विद्यालयाचे मुख्याध्यापक महाराष्ट्र शासन राज्य पुरस्कार प्राप्त सुनील पुजारी यांनी सांगितले आणि नवीन शैक्षणिक वर्षाच्या विद्यार्थ्यांना व शिक्षकांना शुभेच्छा ही दिल्या. उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपल्यानंतर 15 जून पासून ग्रामीण भागात नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात झाली. नवगतांचे स्वागत नवगतांचे स्वागत व प्रवेशोत्सव कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक विद्यालयाचे सहशिक्षक अण्णाप्पा सातलगावकर यांनी केले.

पालकांनी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थी व विद्यार्थिनींचे गुलाब फूल देऊन स्वागत करण्यात आले आणि पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. इयत्ता पाचवी ला प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक स्वागत सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी पुष्पवृष्टी आणि टाळ्याच्या गजरात केले. शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत गोड खीर विद्यार्थ्यांना देऊन पहिला दिवस गोड करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख युवराज होळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन शुभांगी कारंजे यांनी मानले. यावेळी कार्यक्रम यशस्वीतेसाठी रमेश चव्हाण, गोरख जगताप, जगदेवी शंकर शेट्टी, विठ्ठल पाटील शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## अंबरनाथकरांना एक दिवसाआड येते पाणी

आधुनिक केसरी न्यूज

**अंबरनाथ :** दरवर्षीप्रमाणे यंदाही जून महिन्यात पावसाने ओढ दिल्याने धरणातील पाणीसाठा दिवसेंदिवस तळ गाठतो आहे. अंबरनाथ शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या चिखलोली धरणाने तळ गाठल्याने बुधवार, १९ जूनपासून अंबरनाथकरांना एक दिवसाआड पाणी पुरवठा केला जाणार आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मंगळवारी याबाबतचा निर्णय जाहीर केला. अंबरनाथमधील सुमारे एक लाख लोकवस्तीला चिखलोली धरणातून दररोज सहा दशलक्ष लिटर पाण्याचा पुरवठा केला जातो. तर अंबरनाथमधील मोठ्या भागाला बदलापूर येथील बॅरेज बंधारा आणि बारवी धरणातून पाणीपुरवठा केला जातो. दुसरीकडे बदलापूर शहरातही हेंद्रेपाडा येथील जलवाहिनीला मंगळवारी गळती लागल्याने बुधवारी पाणीपुरवठ्यावर त्याचा परिणाम झाला. तर गुरुवारीही काही भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होणार असल्याची माहिती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिली आहे. दा राज्यात पावसाने ओढ दिल्याने सर्वच जलाशयातील पाणीसाठा कमी झाला आहे. पाणी कपात सुरू करण्यात आली असली तरी ठाणे जिल्ह्यात अद्याप अधिकृतरित्या पाणी कपात जाहीर केलेली नाही.

## चिकनगुनियाच्या रुग्णांमुळे भीतीचे वातावरण

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** धरमपेठ, मंगळवारी झोनमध्ये चिकनगुनियाने डोके वर काढल्याचे चित्र आहे. या दोन्ही झोनमध्ये मागील १८ दिवसांत तब्बल १४ रुग्णांची नोंद झाल्याने महापालिकेच्या आरोग्य विभागाचे धाबे दणाणले आहे. चिकनगुनियाचे रुग्ण आढळलेल्या भागात धरमपेठ झोनमधील सुरेंद्रगड, के. टी. नगर, गिट्टीखदान तर मंगळवारी झोनमधील भूपेशनगर, बर्डे लेआऊट, बोरगाव या भागाचाही समावेश आहे. रुग्ण आढळलेल्या भागासह इतरही भागात कीटकनाशक फवारणी, जनजागृतीसह इतरही प्रतिबंधात्मक उपाय हाती घेण्यात आले आहेत. संशयित रुग्ण आढळताच तपासणी केली जात आहे. सोबतच महापालिका, मेडिकल, मेयो रुग्णालयात आवश्यक औषध उपलब्ध ठेवण्याची सूचना देण्यात आली आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, नागपूर शहरात जानेवारी ते मे २०२४ दरम्यानच्या काळात एकही चिकनगुनियाच्या रुग्णाची नोंद नव्हती. परंतु जून महिन्याच्या १८ दिवसांत ४४ संशयितांच्या वैद्यकीय तपासणीत १४ रुग्णांना चिकनगुनिया असल्याचे स्पष्ट झाले आहे. शहरात वाढत्या गर्मीमुळे घरोघरी कुलर, वातानुकूलित यंत्र सुरू आहेत. सोबतच अनियमित पावसामुळे शहरातील वातावरण दमट झाले आहे. असे वातावरण डासांची घनता वाढवण्यासाठी पोषक आहे.

